परिपत्रक

क्र.राप/कर्मवर्ग/मावक/३३८
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई - ४०० ००८
दिनांक : १५ जानेवारी,२०२१

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे
- उपमहाव्यवस्थापक,
  नियंत्रण समिती क्र.१ (मुंबई/पुणे)
  नियंत्रण समिती क्र.२ (नाशिक/औरंगाबाद)
  नियंत्रण समिती क.३ (अमरावती/नागपूर)
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
- विभाग नियंत्रक,
  म.रा.मा.प.महामंडळ, मुंबई/ ठाणे/ रत्नागिरी/ रायगड/ सिंधुदुर्ग/ पालघर/ पुणे/ सातारा/ सांगली/ सोलापूर/ कोल्हापूर/ नाशिक/ धुळे/ जळगांव/ अहमदनगर /औरंगाबाद/ बीड/ जालना/ नांदेड/ उस्मानाबाद/ लातूर/ परभणी/ नागपूर/ चंद्रपूर/ भंडारा/ वर्धा/ गडचिरोली/ अमरावती/ बुलडाणा/ अकोला/ यवतमाळ.

**विषयः-** अनुसूचित जमाती प्रवर्गातून नियुक्त झालेल्या तथापि जात वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकलेल्या अथवा अन्य जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्या यांच्याकरिता अधिसंख्य पदे निमार्ण करण्याबाबत.

**संदर्भः-** १) परिपत्रक क्र.राप/कर्मवर्ग/मावक/१६ दि.०१ जानेवारी,२०२१
२) परिपत्रक क्र.राप/कर्मवर्ग/मावक/२०९ दि.०८ जानेवारी,२०२१
३) शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्रमांकः ईएसटी-२०२०/प्र.क्र. ४/ ई-८ दिनांक २७ जानेवारी, २०२०

*****

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भ क्र.३ प्रमाणे प्राप्त झालेल्या सूचना खालील प्रमाणे आहेत.

सामान्य प्रशासन विभागाने संदर्भाधीन शासन निर्णायान्वये सुचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेले, अवैध ठरल्यानंतर विशेष मागास प्रवर्गाचे अथवा अन्य कोणत्याही मागासप्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले, अनुसूचित जमातीचा दावा सोडून दिलेले, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर न केलेले, जात पडताळणी समितीच्या निर्णया विरोधात मा.न्यायालयात याचिका दाखल केलेले मात्र, मा.न्यायालयाने स्थगिती न दिलेल्या जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याने सेवा समाप्ता केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करणे.

सदर शासन निर्णयामध्ये अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरलेले, अवैध ठरल्यानंतर विशेष मागास प्रवर्गाचे अथवा अन्य कोणत्याही मागास प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले,अनुसूचित जमातीचा दावा सोडून दिलेले,जता पडताळणी समितीकेडे प्रस्ताव सादर न केलेले, जात पडताळणी समितीच्या निर्णयाविरोधात मा.न्यायालयात याचिका दाखल केलेले मात्र मा.न्यायालयाने स्थगिती न दिलेले व जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरल्याने सेवा समाप्त केलेल्या आहे.

..२

संदर्भिय शासन निर्णयापुर्वी सेवासमाप्त करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचारी हे सेवासमाप्त पुर्वी ज्या पदावर कार्यरत होते, त्या पदाकरिता अधिसंख्य पद निर्माण करुन सदर अधिसंख्य पद तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याकरिता किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत सदर अधिकारी/कर्मचारी यांच्याकरिता अधिसंख्य पद अस्तित्वात राहील.

सदर परिपत्रक मिळाल्याची पोच द्यावी.

सहाव्यवस्थापक (क.व औ.सं.) करिता

प्रत :

मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ सहायक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग)/ (घटकसंवर्ग)/ (मनुष्यबळ)/(समन्वय)/(सामान्य प्रशासन)/ (प्रशासन)/(मुख्यालय) यांचे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ २३८
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४०० ००८.
दिनांक: ११ जानेवारी, २०२१.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /
नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषय: महामंडळातील अधिकारी तसेच वर्ग-३ व वर्ग-४ प्रवर्गातील कर्मचा-यांच्या विरुध्द प्रलंबित असणा-या अपराध प्रकरणांचा निपटारा करणेबाबत.

संदर्भ: १.या कार्यालयाचे पत्र क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/५३६९, दि.०५.१०.२०१७.
२.या कार्यालयाचे पत्र क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/११६७, दि.१८.०२.२०१९.
३.या कार्यालयाचे पत्र क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/३८०६, दि.०८.०७.२०१९.

--------

संदर्भित पत्रान्वये अपराध प्रकरणे व प्रथम आवेदने निकाली काढण्याकरिता कालबध्द कार्यक्रम तयार करुन सदर प्रकरणांचा निपटारा परिपत्रकाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत निकाली काढण्याबाबत सूचना अनेकवेळा या कार्यालयामार्फत देण्यात आल्या असूनही अनेक विभागांमार्फत सदर सूचना गांभीर्याने न घेता. अपराध प्रकरणांचा निपटारा त्वरेने करण्याबाबत केलेली कार्यवाही समाधानकारक नसल्याचे निदर्शनास येत आहे.याबाबत वेळोवेळी होणाऱ्या खातेप्रमुखांच्या बैठकीमध्ये नाराजी व्यक्त करण्यात येते. सदर बाब अत्यंत गंभीर आहे. रा.प. महामंडळामध्ये कार्यरत असणा-या अधिकारी तसेच वर्ग-३ व ४ प्रवर्गातील कर्मचा-यांचे विरुध्द साधारणपणे २२,३९८ अपराध प्रकरणे प्रलंबित आहेत. ही बाब विचारात घेता प्रलंबित अपराध प्रकरणांचा त्वरेने निपटारा करणे आवश्यक आहे. यासाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. दि.१५ जानेवारी, २०२१ ते दि.१४ फेब्रुवारी, २०२१ हा महिना **''अपराध प्रकरण निपटारा महिना''** म्हणून अंमलात आणावयाचा आहे.

२. या कालावधीमध्ये सर्व सक्षम प्राधिका-यांद्वारे त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या अपराध प्रकरणांचा व प्रलंबित अपील प्रकरणांचा आढावा घ्यावयाचा आहे.

३. सदर कार्यवाही करताना या कार्यालयाद्वारे वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार गैरकृत्याचे वर्गीकरण 'अ', 'ब' व 'क' अशा प्रकारे करण्यात यावे व प्राधान्याने 'क' वर्गातील अपराध प्रकरणांचा निपटारा करण्यात यावा व त्यानंतर 'ब' व 'अ' वर्गाची प्रलंबित अपराध प्रकरणांचा त्वरेने निपटारा करावा.

४. वर नमूद केल्यानुसार प्रलंबित अपराध प्रकरणांचा व प्रलंबित अपील प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी पुढीलप्रमाणे कालबध्द कार्यक्रम आखून देण्यात येत आहे.

कृ.मा.प.

| अ.क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | **अपराध प्रकरण निपटारा मोहिम**<br>(सदर मोहिमे अंतर्गत सक्षम प्राधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रलंबित प्रकरणे निकाली काढावयाची आहेत) | १५ जानेवारी ते १४ फेब्रुवारी, २०२१ |
| २ | संबंधीत सक्षम प्राधिकारी(आगार व्यवस्थापक व घटक कार्यालयातील इतर सक्षम प्राधिकारी)यांनी व अपिलीय प्राधिकारी यांनी अ.क्र.१ नुसार केलेल्या कार्यवाहीचा तपशील खाली नमूद नमुन्यात संबंधीत विभाग नियंत्रक/घटक प्रमुखांकडे सादर करणे. | १५ फेब्रुवारी, २०२१ ते २० फेब्रुवारी, २०२१ |
| ३ | विभाग नियंत्रक/घटक प्रमुख यांनी आपल्या अखत्यारीतील सक्षम प्राधिकारी यांचा वर नमूद मोहिमेप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे व दिर्घकाळ प्रकरणे प्रलंबित ठेवणा-या संबंधीत सक्षम प्राधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन अहवाल व प्रलंबित अपराध प्रकरणांचा तपशील खालील नमुन्यात सनियंत्रण समितीला सादर करणे. | २२ फेब्रुवारी, २०२१ ते २४ फेब्रुवारी, २०२१ |
| ४ | संबंधीत नियंत्रण समिती प्रमुख यांनी आपल्या अखत्यारीतील विभाग नियंत्रक/ घटक प्रमुख यांनी केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे व वर नमूद कार्यवाहीमध्ये कसूर करणा-या विभाग नियंत्रक/ घटक प्रमुख यांचेवर जबाबदारी निश्चित करुन अहवाल व प्रलंबित अपराध प्रकरणांचा तपशील खालील नमुन्यामध्ये मध्यवर्ती कार्यालयास सादर करणे. | २५ फेब्रुवारी, २०२१ ते २७ फेब्रुवारी, २०२१ |
| ५ | उप महाव्यवस्थापक (सनियंत्रण समिती क्र.१, २ व ३) यांनी अनु.क्र.३ व ४ नुसार केलेल्या कार्यवाहीच्या तपशीलासह व दिर्घकाळ अपराध प्रकरणे व अपील प्रकरणे प्रलंबित ठेवणा-या सक्षम प्राधिका-यांवर केलेल्या कारवाईच्या सविस्तर तपशीलासह मध्यवर्ती कार्यालयात उपस्थित राहणे. | सनियंत्रण समिती क्र.१ ०१ मार्च, २०२१ |
| | | सनियंत्रण समिती क्र.२ ०२ मार्च, २०२१ |
| | | सनियंत्रण समिती क्र.३ ०३ मार्च, २०२१ |

सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी की, प्रतिवर्षी प्रमाणे ही मोहिम राबविण्याचा केवळ सोपस्कार पार न पाडता, वर नमुद कालबध्द कार्यक्रमानुसार अपराध प्रकरण निपटारा मोहिम प्रभावीपणे राबविण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व प्रलंबित प्रकरणांचा गोषवारा खालील नमुन्यात विहित कालावधीमध्ये वर नमुद केल्यानुसार संबंधित विभाग नियंत्रक व संबंधित उप महाव्यवस्थापक, संनियंत्रण समिती यांचेकडे सादर करावा. वर नमुद सूचनांची तंतोतंतपणे अंमलबजावणी करण्यात यावी. अन्यथा सदर बाब मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे निदर्शनास आणून कठोर कारवाई करण्यात येईल.

| विभाग | दिनांक १४.०१.२१ अखेर प्रलंबित असलेली एकूण अपराध प्रकरणे | दिनांक १५.०१.२१ ते दिनांक १४.०२.२१ कालावधीत निकाली काढलेली प्रकरणे | दिनांक १५.०१.२१ ते दिनांक १४.०२.२१ कालावधीत निकाली काढलेल्या प्रकरणांची टक्केवारी | दिनांक १५.०२.२१ रोजी प्रलंबित अपराध प्रकरणे | | | | दिनांक १४.०१.२१ अखेर प्रलंबित असलेल्या एकूण प्रथम अपिलांची संख्या | दिनांक १५.०१.२१ ते दिनांक १४.०२.२१ कालावधीत निकाली काढलेल्या अपिलांची संख्या | दिनांक १५.०१.२१ ते दिनांक १४.०२.२१ कालावधीत निकाली काढलेल्या अपिलांची टक्केवारी | दिनांक १५.०२.२१ रोजी प्रलंबित अपिलांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ० ते ६ महिने पर्यंत प्रलंबित | ६ महिने ते १ वर्ष पर्यंत प्रलंबित | १ वर्षा पुढील प्रलंबित | एकूण प्रलंबित प्रकरणे | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |

सदर परिपत्रकाची पोच द्यावी.

(शैलेंद्र चव्हाण)
**महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)**

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार / सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग)/ (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग)/ (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/ २९२४
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ०८
दिनांक : ०५.०५.२०२१

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/
  कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
  परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

**विषय :-** महाराष्ट्र राज्यातील कोरोना विषाणु प्रसारास प्रतिबंधात्मक उपाय म्हणून घोषित केलेल्या कालावधीत दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांच्या कार्यालयातील उपस्थितीत सूट देणेबाबत.

**संदर्भ :-** १.क्र.राप/ आस्था/४०८ई(१)/१६२३ दि.३०.०४.२०२०
२.कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. क्र.राप/आस्था/४०८ई(१)/१८२७ दि.२४.०६.२०२०
३.क्र.राप/ आस्था/४०८ई(१)/२७६७ दि. ०७.१०.२०२०

******

उपरोक्त विषयाबाबत शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.दिव्यांग-२०२०/ प्र.क्र.३५./दि.क.२ दिनांक ०३.०५.२०२१ ची प्रत माहीतीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

शासन निर्णयाच्या अनुषंगाने रा.प.महामंडळातील दिव्यांग कर्मचारी / अधिकारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट देण्याचा व त्यांना Work From Home ची मुभा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तथापि, या सुटीमुळे कामकाजात अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता संबधित खाते / विभाग / घटक प्रमुख यांनी घ्यावी.

(माधव काळे)
**महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)**

**सोबत :-** वरीलप्रमाणे.

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/विधी सल्लागार (वर्ग-१) /महाव्यवस्थापक(भां.व ख.)/महाव्यवस्थापक(वाहतूक)/महाव्यवस्थापक(नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य कामगार अधिकारी/ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/(प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ)/ (नियोजन)/(समन्वय)/ (घटकसंवर्ग).

करोना विषाणु प्रसारास प्रतिबंधात्मक उपाय म्हणून घोषित केलेल्या कालावधीत शासकीय कार्यालयातील दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना उपस्थितीत सुट देणेबाबत..

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक: दिव्यांग-२०२१/प्र.क्र.३५./दि.क.२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: - ०३ मे, २०२१

वाचा: १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासन परिपत्रक क्र.दिव्यांग-२०२०/ अनौ.सं.०७/सा.प्र.वि./दि.क.-२,दिनांक २५.०९.२०२०

२) केंद्र शासनाच्या कार्मिकता,लोकशिकायत व पेन्शन विभागाचा कार्यालयीन आदेश दिनांक १९.०४.२०२१

३) सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय, दिनांक २१ एप्रिल, २०२०.

४) सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय, दिनांक ११ जुन, २०२०

**प्रस्तावना:-**

सद्यस्थितीत संपुर्ण महाराष्ट्रात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता शासकीय कार्यालयांमध्ये रोटेशन पध्दतीने दैनंदिन उपस्थिती काही टक्क्यांच्या मर्यादेपर्यत ठेवण्याच्या सूचना सामान्य प्रशासन विभागाने या अगोदरच निर्गमित केलेल्या आहेत. तसेच दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांच्या अनुपस्थितीची कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होणार नाही, याची संबंधीत आस्थापनांद्वारे दक्षता घेवून शासकीय कार्यालयात उपस्थित राहण्यापासुन त्यांना सुट देण्याबाबत या अगोदरच संदर्भाधीन क्र.१ येथील शासन परिपत्रक निर्गमित केलेले आहे. सद्यस्थितीत सदर परिपत्रक लागू राहिल किंवा कसे याबाबत विविध विभागांनी विचारणा केलेली आहे तसेच विविध संघटनांकडूनही त्यावरील अमंलबजावणी संदर्भात या विभागाकडे निवेदने पाठविली आहेत. हे विचारात घेवून सुधारीत परिपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन परिपत्रक</u>:-**

सद्यस्थितीत संपुर्ण महाराष्ट्रात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता शासकीय कार्यालयामध्ये रोटेशन पध्दतीने दैनंदिन उपस्थिती काही टक्क्यांच्या मर्यादेपर्यत ठेवण्याच्या सूचना सामान्य प्रशासन विभागाने या अगोदरच निर्गमित केलेल्या आहेत.दिव्यांग व्यक्तींची रोग प्रतिकार शक्ती सर्वसामान्यांच्या तुलनेत तितकीशी चांगली नसल्याने अडचणींचा सामना करणे कष्टप्रद व त्रासदायक होत असल्याने सर्व दिव्यांग कर्मचाऱ्यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सुट देण्यात यावी व त्यांना Work From Home ची मुभा देण्यात यावी तथापि या सुटीमूळे कामकाजात अडचण येणार नाही याची दक्षता संबंधीत विभाग/आस्थापना घेतील. या मार्गदर्शक सूचना पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत सर्व संबंधीत विभाग/आस्थापनांना लागू राहतील

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतीक क्रमांक २०२१०५०३१४३७१३००२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

DINESH RAMCHANDRA DINGLE

(दि.रा.डिंगळे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
५. मा.राज्यमंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
६. मा. मुख्य सचिव यांचे यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय,मुंबई
८. आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे.
९. आयुक्त,समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०.निवड नस्ती, दिव्यांग कल्याण-२.

क्रमांक:राप/कर्मवर्ग/आस्था/४०८-ई(१)/२०
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ०८
दिनांक : ०७ .०१.२०२१

मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे कार्यालय/
मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे कार्यालय/
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/
महाव्यवस्थापक (भां.व ख.)/महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक(नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) / विधी सल्लागार (वर्ग-१)/ मुख्य सांख्यिकी अधिकारी /मुख्य कामगार अधिकारी/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी / कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं)

विषय:- कोविड-१९ संसर्ग रोगाच्या पार्श्वभूमीवर सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील प्रशासकीय बदल्यांबाबत.

संदर्भ :- १.कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.३४/२०२०,
क्र.राप/आस्था/४०८ई(१)/३७२६ दि.२४.११.२०२०
२.कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.०५/२०१४,
क्र.राप/आस्था/२०१-ई/२१३९ दि.०३.०५.२०१४

******

कोरोना-१९ या संसर्गजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर, महामंडळाची आर्थिक स्थिती विचारात घेता चालू आर्थिक वर्षात रा.प.महामंडळातील अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रशासकीय बदल्या न करण्याबाबत सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

तथापि, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव कमी होत असल्याने व शासनाने पुन:श्च प्रारंभ अंतर्गत लॉकडाऊनच्या कालावधीतील निर्बंध शिथिल केले आहेत व महामंडळाची वाहतुक पुर्ववत सुरु होत आहे. या अनुषंगाने रा.प.महामंडळातील प्रशासकीय बदल्या या बदल्यांच्या विनिमयातील तरतुदीनुसार करण्याबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहे.

१. सध्या रा.प. महामंडळातील कर्मचारी / अधिकारी यांच्या महामंडळ स्तरावरील प्रशासकीय बदल्या, करता येतील.

२. तथापि, प्रादेशिक व विभागीय स्तरावरील प्रशासकीय बदल्यांबाबत सद्यस्थितीत कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये.

सदरच्या सुचना या उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

(शैलेंद्र चव्हाण) ७/१
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना -

कर्मचारीवर्ग अधिकारी / सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी सा.प्रशासन/ प्रशासन/ मुख्यालय / राज्यसंवर्ग/मावक/मनुष्यबळ, नियोजन/समन्वय/घटकसंवर्ग/सेमं.

D:\GAD\Circular\Gen Circular-2021.docx

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.०१ /२०२१

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/०१
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ०८.
दिनांक :- ०१ जानेवारी, २०२१.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प.दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/ कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय : सन २०२० मध्ये कर्मचारीवर्ग खात्याकडून प्रसारित करण्यात आलेल्या परिपत्रकांबाबत.

----

कर्मचारीवर्ग खात्याकडून दरवर्षी वेगवेगळया विषयावर परिपत्रके प्रसारित करण्यात येतात. सदर परिपत्रके सर्व विभाग/घटक कार्यालयात एकत्रित असणे व दैनंदिन कामकाजाच्या वेळी सर्व स्तरावर उपलब्ध होणे अपेक्षित आहे.

सन २०२० मध्ये कर्मचारीवर्ग खाते, मध्यवर्ती कार्यालयाकडून प्रसारीत केलेल्या काही महत्वाच्या परिपत्रकांची यादी या पत्रासोबत माहितीस्तव पाठविण्यात येत आहे. कर्मचारीवर्ग खात्याने प्रसारीत केलेली सर्व परिपत्रके आपल्या दप्तरी असल्याची खातरजमा करुन आपल्या स्तरावर संकलित करण्यात यावीत.

सोबत - वरीलप्रमाणे

(शैलेंद्र चव्हाण)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक (भां.व ख.) / महाव्यवस्थापक (वाहतूक)/महाव्यवस्थापक(नियोजन व पणन)/महाव्यवस्थापक (यं.अ)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ उपमहाव्यवस्थापक (बांधकाम)/मुख्य विधि अधिकारी /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/ अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/(प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/ समन्वय) /(घटकसंवर्ग).

# परिपत्रके - २०२०

## सन २०२० मध्ये कर्मचारीवर्ग खाते कडून प्रसारीत करण्यात आलेली परिपत्रके

| क्र. | विषय | जावक क्र. व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | सन २०२० मध्ये कर्मचारीवर्ग खात्याकडुन प्रसारीत करण्यात आलेल्या परिपत्रकाबाबत. | क्र.राप/आस्था/४०८ई-(१)/१ दि.०१.०१.२०२० |
| ०२ | सुधारीत शिस्त व अपिल (एकत्रित कार्यवाहीबाबत) | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/७८ दि.०४.०१.२०२० |
| ०३. | रा.प.महामंडळाच्या नामिकेवर असलेल्या रुग्णालयांना सी.जी.एच.एस. दराने उपचार करण्याच्या अटीवर तयार असल्यास नामिकेवरील मान्यता पुढे सुरु ठेवणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/२५४ दि.१५.०१.२०२० |
| ०४. | रा.प.सेवेत असताना कर्मचा-यांना अपंगत्व आल्यामुळे कर्मचा-यांना पर्यायी नोकरी देणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/४८-ई/४९७ दि.२३.०३.२०२० |
| ०५ | शासन निर्णय क्र.घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/१२विनियम दि.२०.०५.२०१७ नुसार घरबांधणी अग्रिम सुधारणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/५१६ दि.२४.०१.२०२० |
| ०६ | शासन निर्णय क्र.घबांअ-२०१५/प्र.क्र.२२/१५ विनियम दि.०१.०२.२०१८ | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/९३३ दि.१३.०२.२०२० |
| ०७. | लालचुपत व इतर गंभीर प्रकरणी फौजदारी गुन्हयाव्यतिरीक्त अन्य कारणामुळे निलंबीत केलेल्या व निलंबन मागे घेतलेल्या कर्मचा-यांचा १८० दिवसापुढील निलंबन कालावधी नियमित करणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/१३४२ दि.०७.०३.२०२० |
| ०८. | सुधारीत शिस्त व अपिल कार्यपध्दतीबाबत. (५०/२०१९ वर स्थगितीबाबत.) | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/१३७५ दि.११.०३.२०२० |
| | कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शासन निर्णयानुसार रा.प.महामंडळातील अधिकारी / कर्मचारी यांची उपस्थिती नियंत्रित करणेबाबत. | क्र.राप/आस्था/४०८ई-(१)/१५६१ दि.२०.०३.२०२० |
| ०९. | शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१ अंतर्गत शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/घटकसंवर्ग/ १५८७ दि.२१.०४.२०२० |
| १०. | अत्यावश्यक सेवेअंतर्गत संचारबंदी कालावधीत प्रत्यक्ष कर्तव्य करणा-या रा.प.कर्मचारी,पर्यवेक्षक यांना प्रतिदिन प्रतिव्यक्तीस रु.३००/- विशेष प्रोत्साहन भत्ता अदा करणेबाबत. | क्र राप/कर्मवर्ग/सा.प्रशा/१६२१ दि.३०.०४.२०२० |
| | कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लागू करण्यात आलेला लॉकडाउनच्या कालावधीमध्ये रा.प.महामंडळातील दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांच्या कार्यालयातील उपस्थितीबाबत. | क्र.राप/आस्था/४०८ई-(१)/१६२३ दि.३०.०४.२०२० |
| ११. | शिस्त व अपिल कार्यपध्दती अंतर्गत त्वरीत निकाली काढता येणारी अपराध प्रकरणे संक्षिप्त आरोपपत्रावर निकाली काढणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/१६२४ दि.३०.०४.२०२० |
| १२. | सेवा विनियम १८९,१९२ व १९३ अंतर्गत वैद्यकीय प्रतिपुर्तीबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/१६५४ दि.२२.०५.२०२० |
| १३. | कोविड १९ संबधित कर्तव्य बजावताना कोविडमुळे मृत्यू होणा-या कर्मचा-यांना विमा कवच/सानुग्रह सहाय्य लागू करण्याबाबत. | क्र.राप/आस्था/४०८ई-१)/१६७१ दि.०१.०६.२०२० |
| १४. | कोविड १९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात होणा-या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत करावयाच्या उपाययोजना बदल्याबाबत | क्र.राप/आस्था/४०८ई-(१)/१७०७ दि.०९.०६.२०२० |
| १५. | महाराष्ट्र राज्यातील कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनच्या अनुषंगाने राज्यात रा.प.महामंडळाच्या कामकाजासाठी ई-मेल तसेच व्हॉटस् ॲपचा वापर ग्राहय धरण्याबाबत. | क्र.राप/आस्था/४०८ई-(१)/१७२५ दि.१०.०६.२०२० |
| १६. | महामंडळाच्या कर्मचा-यांना रा.प.बसमधून प्रवास करण्यासाठी मिळणा-या मोफत पासा संदर्भात (पडताळणीच्या बाबी) | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/१७७१ दि.१८.०६.२०२० |

..२..

| | | |
|---|---|---|
| १७. | मर्यादित उपस्थितीच्या काळात रा.प.कार्यालयातील कर्मचा-यांची उपस्थिती सुनिश्चित करणे व वेतन आहरित करण्याबाबत. | क्र.राप/आस्था/४०८ई(१)/ १७८० दि.१९.०६.२०१८ |
| | कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लागू करण्यात आलेला लॉकडाउनच्या कालावधीमध्ये रा.प.महामंडळातील दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांच्या कार्यालयातील उपस्थितीबाबत स्पष्टीकरणात्मक सुचना | क्र.राप/आस्था/४०८ई(१)/ १८२७ दि.२४.०६.२०१८ |
| | चालक,वाहक,सहाय्यक (मदतनीस)/ईशाराकार आणि प्रमुख यांत्रिकाच्या श्रेणीखालील सर्व कार्यशाळा कर्मचारी व सहाय्यक वाहतूक निरीक्षकांच्या श्रेणीखालील सर्व वाहतूक कर्मचारी यांचे सरासरी वेतनावर /अर्जित रजेबाबत | क्र.राप/कर्मवर्ग/मुख्या/१८८२ दि.२९.०६.२०२० |
| १८. | शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा सक्षमपणे वापर करणेबाबत | क्र.राप/आस्था/४०८ई-(१)/१९७५ दि.०९.०७.२०२० |
| १९. | सन २०२०-२१ करिता अंदाजपत्रकातील घरबांधणी/स्कुटर/मोटार सायकल/लूना/संगणक अग्रीम उपलब्ध करुन देणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/२०२९ दि.१७.०७.२०२० |
| २०. | अपहार प्रवण क्षेत्रात असलेल्या वाहकांच्या बदलीबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/२०३० दि.१७.०७.२०२० |
| २१. | कोविड १९ च्या संसर्गजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील बदल्यां सदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत | क्र.राप/आस्था/४०८ई-(१)/२१६२ दि.०५.०८.२०२० |
| २२. | कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये रा.प.महामंडळातील गर्भवती महिला तसेच व्याधीग्रस्त अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयातील उपस्थितीबाबत सूट मिळण्याबाबत स्पष्टीकरणात्मक सुचना | क्र.राप/आस्था/४०८ई-(१)/२१६४ दि.०७.०८.२०२० |
| २३. | शासनमान्य खाजगी रुग्णालय अथायु मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, कोल्हापूर या रुग्णालयाला CGSH च्या दराने रा.प.महामंडळाच्या नामिकेवर घेण्याबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/२३९४ दि.०४.०९.२०२० |
| २४. | शासनमान्य खाजगी रुग्णालयाला CGSH च्या दराने रा.प.महामंडळाच्या नामिकेवर घेण्याबाबत.(आत्मा मलिक हॉस्पिटल, कोकम ठाण, जि.अहमदनगर) | क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/२४३७ दि.०७.०९.२०२० |
| २५. | अनुकंपा तत्वावर 'कनिष्ठ संगणित्र चालक' या पदामध्ये नेमणूक देण्याबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/४८६-ई २४९० दि.१०.०९.२०२० |
| २६. | नैसर्गिक आपत्तीमध्ये पिडीत झालेल्या रा.प.कर्मचा-यांना विशेष पगारी रजा देणेबाबत. | क्र.राप/आस्था/४०८ई-(१)/२४९५ दि.१०.०९.२०२० |
| | कोविड १९ संबधित कर्तव्य बजावताना कोविडमुळे मृत्यू होणा-या कर्मचा-यांना विमा कवच/सानुग्रह सहाय्य लागू करण्याबाबत. | जा.क्र.राप/मुकाअ/७२३ दिनांक १५.०९.२०२० |
| २७. | नैसर्गिक आपत्ती (निसर्ग चक्रिवादळामुळे) पिडीत झालेल्या रा.प.कर्मचा-यांना ३ महिन्याचे अग्रिम वेतन बिनव्याजी देणेबाबत. | क्र.राप/आस्था/४०८ई-(१)/२६४२ दि.२४.०९.२०२० |
| २८. | मराठा आरक्षण आंदोलना दरम्यान मृत पावलेल्या आंदोलकांच्या कुटूंबातील एका अवलंबीतास शैक्षणिक पात्रतेनुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात नोकरी देण्याबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/४८६-ई २६८० दि.२८.०९.२०२० |
| २९. | वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या प्रयोजनार्थ अवलंबित्व ठरविण्यासाठी उत्पन्नावरील मर्यादा सुधारणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/२७५१ दि.०६.१०.२०२० |
| | कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लागू करण्यात आलेला लॉकडाउनच्या कालावधीमध्ये रा.प.महामंडळातील दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांच्या कार्यालयातील उपस्थितीबाबत. | क्र.राप/आस्था/४०८ई-(१)/२७६७ दि.०७.१०.२०२० |
| | कोविड १९ संबधित कर्तव्य बजावताना कोविडमुळे मृत्यू होणा-या कर्मचा-यांना विमा कवच/सानुग्रह सहाय्य लागू करण्याबाबत. | जा.क्र.राप/मुकाअ/८४५ दिनांक ०९.१०.२०२० |

| | | |
|---|---|---|
| ३०. | रा.प.महामंडळाच्या नामिकेवर असलेल्या खाजगी रुग्णालयांना CGSH च्या दराने उपचार करण्याच्या अटीवर नामिकेवर मान्यता पुढे सुरु ठेवणेबाबत. | क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/२८१३ दि.१२.१०.२०२० |
| ३१. | विभाग नियंत्रक यांनी बडतर्फ केलेल्या तृतीय श्रेणी कर्मचा-यांच्या अपिलाबाबत | क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/२८५६ दि.१४.१०.२०२० |
| ३२. | रा.प.कर्मचा-यांची उपस्थिती १०० टक्के करणेबाबत. | क्र.राप/आस्था/४०८ई-(१)/ ३२५१ दि.३१.१०.२०२० |
| ३३. | कोविड १९ मुळे मृत्यू होणा-या कर्मचा-यांना विमा कवच/सानुग्रह सहाय्य लागू करण्यास मुदतवाढ मिळणेबाबत. | क्र.राप/आस्था/४०८ई-(१)/३६९३ दि.२३.११.२०२० |
| ३४. | कोविड १९ च्या संसर्गजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील बदल्यां संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत. | क्र.राप/आस्था/४०८ई-(१)/३७२६ दि.२४.११.२०२० |
| ३५. | वेतन तारखांबाबत (सर्व रा.प.कर्मचा-यांच्या वेतनाची तारीख पुढील महिन्यापासून प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेस करणेबाबत. | क्र.राप/आस्था/४०८ई-(१)/३८१७दि.२६.११.२०२० |
| | चालक,वाहक,सहाय्यक (मदतनीस)/ईशाराकार आणि प्रमुख यांत्रिकाच्या श्रेणीखालील सर्व कार्यशाळा कर्मचारी व सहाय्यक वाहतूक निरीक्षकांच्या श्रेणीखालील सर्व वाहतूक कर्मचारी यांचे सरासरी वेतनावर /अर्जित रजेबाबत | क्र.राप/आस्था/४०८ई-(१)/४१४८दि.१४.१२.२०२० |
| ३६. | सर्व रा.प.कार्यालयामध्ये काम करणा-या नियमित तसेच कंत्राटी स्वरुपातील अधिकारी / कर्मचारी /सल्लागार यांचेसाठी कार्यालयात परिधान करावयाच्या पोशाखा संदर्भात (ड्रेस कोड)मार्गदर्शक सुचना | क्र.राप/आस्था/४०८ई-(१)/४२७७दि.१६.१२.२०२० |

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. ०२/२०२१
महत्त्वाचे / तातडीचे :

क्र.राप/ कर्मवर्ग/आस्था/घसं/ २०४
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक : ०८ .०१.२०२१.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/ धुळे/ अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/ उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ.

...

विषय : शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत.

संदर्भ : कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. ०९/२०२०,
संदर्भ क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/घसं/१५८७, दिनांक २१.०४.२०२०.

...

शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१ व कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.११/२०१७, दिनांक २२.०३.२०१७ नुसार वर्षातून केव्हाही तांत्रिक व्यवसायिक व आय.टी.आय. उत्तीर्ण, कार्यशाळा शिकाऊ उमेदवारांची नेमणूक केली जाते व त्यांना शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार विद्यावेतन अदा करण्यात येते.

विद्यावेतनवाढ ही संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाद्वारा अधिसूचित अर्धकुशल कर्मचा-यांसाठी निश्चित केलेल्या किमान वेतनावर आधारित आहे. कामगार आयुक्त यांनी त्यांचे दि.२८.०१.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार किमान वेतन हे मुळ वेतन अधिक विशेष भत्ता एकत्रित करुन परिगणित करण्यात येते. मूळ वेतनावर दिला जाणारा विशेष भत्ता प्रत्येक सहा महिन्यानंतर बदलत असतो.

सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षणार्थी संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांचे पत्र क्र.२१/एटीएस/२०१५/प्र.क्र.१४/१७५ दिनांक १०.०९.२०१५ अन्वये किमान वेतनाच्या (Minimum Wages) दरामध्ये वेळोवेळी होणारे बदल सुधारण्यासाठी www.paycheck.in/India या संकेतस्थळावरुन अधिक माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

कामगारांकरीता विशेष भत्याच्या रक्कमेबाबत मा.कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई यांनी दि.०५.०२.२०२० रोजी प्रसिध्द केलेल्या परिपत्रकानुसार दि.०१.०१.२०२० ते ३०.०६.२०२० या कालावधीकरिता खालीलप्रमाणे किमान वेतनाचे (Minimum Wages) दर दर्शविण्यात आले आहेत.

| अनु.क्र. | तपशिल | किमान वेतनाचे दर | |
|---|---|---|---|
| | | परिमंडळ - १ | परिमंडळ - २ |
| १. | मुळवेतन | ४६००.०० | ४४००.०० |
| २. | विशेष भत्ता | ५४८७.०० | ५४८७.०० |
| ३. | एकुण | १००८७.०० | ९८८७.०० |

..२..

उपरोक्त दर्शविलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय, श्रम व रोजगार मंत्रालय अधिसूचना भाग - II, खंड - ३, उपखंड (i) दि.२२.०९.२०१४ नुसार सुधारीत दर खालीलप्रमाणे दर्शविण्यात येत आहेत.

| क्र. | वर्ष | पूर्वीचा दर (परिपत्रक क्र.०१/२०२० संदर्भ क्र. राप/कर्मवर्ग/आस्था/घसं/१५८७ दि.२१.०४.२०२० ) | | सुधारित दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | किमान वेतन = मुळ वेतन + विशेष भत्ता<br>परिमंडळ-१ =<br>मुळ वेतन रु. ४६०० +<br>विशेष भत्ता रु. ५११९.००<br>= रु.९७१९.०० व<br>परिमंडळ-२ =<br>मुळ वेतन रु. ४४०० +<br>विशेष भत्ता रु. ५११९.००<br>=रु. ९५१९.००<br>(विशेष भत्ता दि.०१.०७.२०१९ ते ३१.१२.२०१९ कालावधीकरीता www.paycheck.in/India येथे दर्शविल्यानुसार)<br>याप्रमाणे निश्चित केलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार<br>सुधारित दर (रुपयामध्ये) | | किमान वेतन = मुळ वेतन + विशेष भत्ता<br>परिमंडळ-१ =<br>मुळ वेतन रु. ४६०० +<br>विशेष भत्ता रु. ५४८७.००<br>= रु. १००८७.०० व<br>परिमंडळ-२ =<br>मुळ वेतन रु. ४४०० +<br>विशेष भत्ता रु. ५४८७.००<br>=रु. ९८८७.००<br>(विशेष भत्ता दि. ०१.०१.२०२० ते ३०.०६.२०२० कालावधीकरीता मा.कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई यांनी दि.०५.०२.२०२० रोजी प्रसिध्द केलेल्या परिपत्रकानुसार)<br>याप्रमाणे निश्चित केलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार<br>सुधारित दर (रुपयामध्ये) | |
| | | परिमंडळ - १ | परिमंडळ - २ | परिमंडळ - १ | परिमंडळ - २ |
| १ | पहिले वर्ष | किमानवेतन रु. ९७१९.०० च्या ७०% = रु. ६८०३.३० | किमानवेतन रु. ९५१९.०० च्या ७०% = रु. ६६६३.३० | किमानवेतन रु. १००८७.०० च्या ७०% = रु.७०६०.९० | किमानवेतन रु.९८८७.०० च्या ७०% = रु.६९२०.९० |
| २ | दुसरे वर्ष | किमानवेतन रु. ९७१९.०० च्या ८०% = रु. ७७७५.२० | किमानवेतन रु. ९५१९.०० च्या ८०% = रु. ७६१५.२० | किमानवेतन रु. १००८७.०० च्या ८०% = रु.८०६९.६० | किमानवेतन रु.९८८७.०० च्या ८०% = रु.७९०९.६० |
| ३ | तिसरे वर्ष | किमानवेतन रु. ९७१९.०० च्या ९०% = रु. ८७४७.१० | किमानवेतन रु. ९५१९.०० च्या ९०% = रु. ८५६७.१० | किमानवेतन रु. १००८७.०० च्या ९०% = रु.९०७८.३० | किमानवेतन रु.९८८७.०० च्या ९०% = रु.८८९८.३० |
| ४ | चौथे वर्ष | | | | |

** परिमंडळ १ - महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगर पालिका व 'अ' वर्ग नगरपालिका क्षेत्रांचे मिळून होईल.
** परिमंडळ २ - परिमंडळ एक वगळून राज्याच्या उर्वरित क्षेत्राचे मिळून होईल.

तसेच, किमान वेतनाच्या (Minimum Wages) दरामध्ये वेळोवेळी होणारे बदल सुधारण्यासाठी www.paycheck.in/India या संकेतस्थळावरुन माहिती घेतली असता दि.०१.०७.२०२० ते दि.३१.१२.२०२० या कालावधीकरिता खालीलप्रमाणे किमान वेतनाचे (Minimum Wages) दर दर्शविण्यात आले आहेत.

| अनु.क्र. | तपशिल | किमान वेतनाचे दर | |
|---|---|---|---|
| | | परिमंडळ - १ | परिमंडळ - २ |
| १. | मुळवेतन | ४६००.०० | ५३००.०० |
| २. | विशेष भत्ता | ५६४४.०० | ५६४४.०० |
| ३. | एकुण | १०२४४.०० | १०९४४.०० |

उपरोक्त दर्शविलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय, श्रम व रोजगार मंत्रालय अधिसूचना भाग - II, खंड - ३, उपखंड (i) दि.२२.०९.२०१४ नुसार सुधारीत दर खालीलप्रमाणे दर्शविण्यात येत आहेत.

| क्र. | वर्ष | पूर्वीचा दर | | सुधारित दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | किमान वेतन = मुळ वेतन + विशेष भत्ता<br>परिमंडळ-१ =<br>मुळ वेतन रु. ४६०० +<br>विशेष भत्ता रु. ५४८७.००<br>= रु. १००८७.०० व<br>परिमंडळ-२ =<br>मुळ वेतन रु. ४४०० +<br>विशेष भत्ता रु. ५४८७.००<br>=रु. ९८८७.००<br>(विशेष भत्ता दि. ०१.०१.२०२० ते दि.३०.०६.२०२० कालावधीकरीता मा.कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई यांनी दि.०५.०२.२०२० रोजी प्रसिध्द केलेल्या परिपत्रकानुसार)<br>याप्रमाणे निश्चित केलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार<br>सुधारित दर (रुपयामध्ये) | | किमान वेतन = मुळ वेतन + विशेष भत्ता<br>परिमंडळ-१ =<br>मुळ वेतन रु. ४६०० +<br>विशेष भत्ता रु. ५६४४.००<br>= रु. १०२४४.०० व<br>परिमंडळ-२ =<br>मुळ वेतन रु. ५३०० +<br>विशेष भत्ता रु. ५६४४.००<br>=रु. १०९४४.००<br>(विशेष भत्ता दि. ०१.०७.२०२० ते दि.३१.१२.२०२० कालावधीकरीता www.paycheck.in/India येथे दर्शविल्यानुसार)<br>याप्रमाणे निश्चित केलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार<br>सुधारित दर (रुपयामध्ये) | |
| | | परिमंडळ - १ | परिमंडळ - २ | परिमंडळ - १ | परिमंडळ - २ |
| १ | पहिले वर्ष | किमानवेतन रु. १००८७.०० च्या ७०% = रु.७०६०.९० | किमानवेतन रु.९८८७.०० च्या ७०% = रु.६९२०.९० | किमानवेतन रु. १०२४४.०० च्या ७०% = रु.७१७०.८० | किमानवेतन रु.१०९४४.०० च्या ७०% = रु.७६६०.८० |
| २ | दुसरे वर्ष | किमानवेतन रु. १००८७.०० च्या ८०% = रु.८०६९.६० | किमानवेतन रु.९८८७.०० च्या ८०% = रु.७९०९.६० | किमानवेतन रु. १०२४४.०० च्या ८०% = रु.८१९५.२० | किमानवेतन रु.१०९४४.०० च्या ८०% = रु.८७५५.२० |
| ३ | तिसरे वर्ष | किमानवेतन रु. १००८७.०० च्या ९०% = रु.९०७८.३० | किमानवेतन रु.९८८७.०० च्या ९०% = रु.८८९८.३० | किमानवेतन रु. १०२४४.०० च्या ९०% = रु.९२१९.६० | किमानवेतन रु.१०९४४.०० च्या ९०% = रु.९८४९.६० |
| ४ | चौथे वर्ष | | | | |

सदर अधिसुचनेमध्ये असे नमुद केले आहे की, जर एखाद्या संबंधीत राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाद्वारा

एखाद्या व्यवसायासाठी किमान वेतनाचा दर ठरवून दिला नसेल तर अशावेळी या व्यवसायातील विद्यावेतन अदा करताना, त्या संबंधीत राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाद्वारा अर्धकुशल कर्मचा-यांसाठी अधिसूचीत केलेल्या अनुसूचीत रोजगारातील जास्तीत जास्त किमान वेतन विचारात घेण्यात यावे. तसेच, सदर अधिसुचनेमध्ये अधिनियम धारा -६ मधील खंड -क मध्ये नमुद केलेल्या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारांनी जर राष्ट्रीय परिषदेने मान्य केलेल्या कोणत्याही विद्यालय किंवा अन्य संस्थामध्ये घेतलेला प्रशिक्षणार्थीचा कालावधी विद्यावेतन अदा करताना विचारात घेण्यात यावा असे नमुद केले आहे.

वर नमुद केल्याप्रमाणे, सुधारित दराने विद्यावेतन अदा करताना अदा केलेले विद्यावेतन व सुधारीत दराने देय होणारे विद्यावेतन यातील फरकाची रक्कम शिकाऊ उमेदवारांना अदा करावी. विद्यावेतन अदा करताना याची पूर्णपणे पडताळणी करुन व लेखा परिक्षण करुनच शिकाऊ उमेदवारांना विद्यावेतन अदा करावे. अतिरिक्त विद्यावेतन अदा केल्याचे निदर्शनास आल्यास, त्याची पुर्णपणे जबाबदारी संबंधित विभाग / घटकाची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

तरी, वर दर्शविलेल्या तारखेपासून सुधारीत दराने विद्यावेतन अदा करण्यात यावे.

सदरचे परिपत्रक हे वित्त व लेखा खात्याच्या सहमतीने प्रसारीत करण्यात येत आहे.

(शैलेंद्र शि. चव्हाण)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत अग्रेषित:-**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व ख)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ.) / मुख्य विधी अधिकारी/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / उपमहाव्यवस्थापक (बांधकाम) / उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्र.१ - मुंबई-पुणे, नियंत्रण समिती क्र.२ - नाशिक - औरंगाबाद, नियंत्रण समिती क्र.३ - अमरावती - नागपूर / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.) / मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन यांस माहितीसाठी.

परिपत्रक क्र. ०३/२०२१

क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/ २६६
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-८.
दिनांक: १२ जानेवारी, २०२१

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /
नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय: शासनमान्य खाजगी रुग्णालयांना CGHS च्या दराने रा.प.महामंडळाच्या नामिकेवर (Panel) घेण्याबाबत.**

**संदर्भ: परिपत्रक क्र.९/८७ जावक क्र.राप/कर्मवर्ग/६०१-वै/२२५८ दिनांक २३.०४.१९८७.**

संदर्भाधिन परिपत्रकाच्या भाग-२, अंतर्गत येणा-या गंभीर आजारांवरील उपचाराकरिता येणा-या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत खालील नमूद खाजगी रूग्णालयास त्याच्या नावासमोर दर्शविलेल्या आजारावरील उपचार करण्यासाठी नागपूर शहराकरिता असलेल्या C.G.H.S. च्या दराने रा.प. महामंडळाच्या नामिकेवर (Panel) घेण्यास सक्षम प्राधिकारी यांनी मान्यता दिली आहे.

| क्र. | रूग्णालयाचे नांव व पत्ता | आजाराचे स्वरूप | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | चंद्रपूर हेल्थ केअर प्रा.लि., सी.एच.एल.मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल, शास्त्री नगर, वॉर्ड नं.३, आदर्श पेट्रोल पंप जवळ, मुल रोड, चंद्रपूर-४४२ ४०१. | अॅन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया (फक्त) | ७१७-२७२२०३<br>मोबाईल ८४५९६१७७८०<br>९७६३७२४७२३ |

उपरोक्त रुग्णालयात रा.प.कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियानी उपचार करुन घेतल्यास त्यांना सदर रुग्णालयाने संमती दर्शविलेल्या C.G.H.S (Central Government Health Scheme) N.A.B.H च्या नागपूर शहराकरिता असलेल्या प्रचलित दराप्रमाणे वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करावी. C.G.H.S. दर (cghs.gov.in ) या अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

सदर रूग्णालयाची वैद्यकीय देयके या कार्यालयाकडे पाठविताना रूग्णालयाने आकारलेले दर नागपूर शहराकरीता असलेल्या C.G.H.S.च्या दरपत्रकानुसार खात्री करावी. तसेच सदर आजारावरील घेतलेल्या इतर उपचारांची दर आकारणी नागपूर शहराकरीता असलेल्या C.G.H.S च्या दरानुसार आकारले असल्याबाबत खात्री करुन व संबंधित मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांचेकडून देयकावर शिफारस घेऊन तसा उल्लेख वैद्यकीय देयकाच्या प्रस्तावामध्ये/नस्तीमध्ये करण्यात यावा. तसेच वैद्यकीय देयकाचे C.G.H.S दरानुसार लेखा अंकेक्षण करताना, दर पत्रकातील अ.क्र.लेखा अंकेक्षण तक्त्यावर नमूद करुन लेखा अंकेक्षण करण्यात यावे व तसे देयकांवर (लेखा तक्त्यावर) प्रमाणीत करण्यात यावे व देयके या कार्यालयाकडे पाठविण्यात यावीत. याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी.

सदर परिपत्रक वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांचे सहमतीने प्रसारीत करण्यात येत असून परिपत्रक प्रसारीत केलेल्या दिनांकापासून लागू राहील. सदर परिपत्रक सर्व अधिकारी / कर्मचारी व मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांच्या निदर्शनास येईल अशा पध्दतीने आपल्या स्तरावर कार्यवाही करावी.

(शैलेंद्र चव्हाण)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं )

E:\Medical\Circular 2020.docx

Scanned by CamScanner

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार / सचिव, म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी(सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.०४/२०२१

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ ४६८
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४०००0८.
दिनांक:२९ जानेवारी, २०२१.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /
नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषय: अपहार प्रवण असलेल्या वाहकांच्या बदली धोरणाबाबत.
संदर्भ: १) परिपत्रक क्र.२/२०१७ क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/६७४ दि.०१.०२.२०१७.
२) परिपत्रक क्र.१७/२०१९ क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/२०९० दि.०२.०४.२०१९.

अपहार प्रवण असलेल्या वाहकांवर अपहार प्रकरणात शिस्त व अपील कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात येत असूनही, अपहार प्रकरणांची संख्या कमी होत नसल्याने अशा अपहार प्रवण वाहकांच्या अपहार प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी त्यांनी केलेल्या अपहार प्रकारानुसार तृतीय प्रमाद प्रकरणी अन्य आगारामध्ये व चतुर्थ व त्यानंतरच्या प्रमाद प्रकरणी संबंधित प्रदेशातील अन्य विभागामध्ये बदली करण्याबाबत परिपत्रक क्र.२/२०१७ दि.०१.०२.२०१७ अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर सूचनांमध्ये अंशत: बदल करण्यात येत असून, पुढीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

२. अपहारप्रवण वाहक कर्मचा-यांच्या तृतीय, चतुर्थ व त्यानंतरच्या अपराध प्रकरणी संबंधित विभागातील अन्य आगारामध्ये प्रशासकीय बदली करण्यात यावी.

३. संदर्भाधीन क्र.२ येथील परिपत्रक क्र.१७/२०१९ दि.०२.०४.२०१९ अन्वये कसूरदार वाहकाच्या चतुर्थ व त्यानंतरच्या प्रमाद प्रकरणी संबंधित प्रदेशातील इतर विभागामध्ये बदली करण्याचे संबंधित प्रदेशाच्या उप महाव्यवस्थापक (सनियंत्रण समिती) यांस देण्यात आलेले अधिकार या परिपत्रकान्वये रद्द करण्यात येत आहेत.

४. परिपत्रक क्र.२/२०१७ दि.०१.०२.२०१७ मधील इतर सूचना कायम राहतील.
परिपत्रकाची पोच द्यावी.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

प्रत माहिती व योग्य कार्यवाहीसाठी :-

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ महाव्यवस्थापक (स्थाअ)/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / मुख्य विधि अधिकारी / सचिव, म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/कर्मचारीवर्ग अधिकारी(सामान्य प्रशासन सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग)/ (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग)/ (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक).

महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.-०५/२०२१

क्रमांक:राप/कर्मवर्ग/आस्था/४०८-ई(१)/४८१
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई- ०८
दिनांक : २१.०१.२०२१

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय:- अतिरिक्त उपदान तथा कर्मचारी ठेव निगडीत विमायोजने अंतर्गत अर्थिक लाभाची मर्यादा पूर्वलक्षी प्रभावाने वाढविणेबाबत.
संदर्भ :-कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.२१/२०१७
क्र.राप/आस्था/साप्र/अतिरीक्त उपदान/३३३८दि.१६.०६.२०१७

******

संदर्भाधिन परिपत्रकान्वये,अतिरीक्त उपदान तथा कर्मचारी ठेव निगडीत विमायोजना,१९७६ अन्वये,रा.प.महामंडळातील कर्मचा-यांना / वारसांना अतिरीक्त उपदान तथा कर्मचारी ठेव निगडीत योजनेअंतर्गत लाभाची रक्कम रु.६,१५,०००/- (सहा लाख पंधरा हजार फक्त ) एवढी करण्याबाबत अटी व शर्तीच्या अधिन सुचना देण्यात आलेल्या आहेत.तथापि,दि.२९.०३.२०१८ पासून पुरवणी उपदानासह उपदानाची कमाल मर्यादा रुपये २०,००,०००/- (रु.वीस लाख) लागू करण्यात आली आहे.त्याअनुषंगाने संदर्भाधिन परिपत्रकातील सुचना क्र.५ मध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

१. नियमित उपदान व अतिरीक्त उपदान मिळुन कमाल मर्यादा पूर्वलक्षी प्रभावाने दि.२९.०३.२०१८ पासून रु.२०,००,०००/- (रु.वीस लाख) देय राहील.

२. दि.२९.०३.२०१८ पासून ज्या मृत कर्मचा-यांच्या वारसांना परिपत्रक क्र.२१/२०१७ अन्वये, नियमित उपदान व अतिरीक्त उपदान मिळुन कमाल रु.१०,००,०००/- मर्यादेत अदा करण्यात आले होते.अशा मृत कर्मचा-यांच्या प्रकरणी रु.१० लाख पेक्षा अधिक परंतु रु.२० लाख कमाल मर्यादेत उपदानाची रक्कम देय असल्यास ती अधिकची रक्कम तात्काळ अदा करावी.

सदरचा बदल हा लेखा शाखेच्या सहमतीने करण्यात येत आहे. या व्यतिरीक्त सदर परिपत्रकामधील अटी व शर्तीमध्ये अन्य कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

(शेखर चन्ने)
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/विधी सल्लागार (वर्ग-१) /महाव्यवस्थापक(भां.व ख.)/महाव्यवस्थापक(वाहतूक)/महाव्यवस्थापक(नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) / मुख्य कामगार अधिकारी/ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/(प्रशासन)/(मुख्यालय) /(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग) / (मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/(घटकसंवर्ग).

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.०६ /२०२१

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/ ५००
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ०८
दिनांक : २२ .०१.२०२१

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र. १-मुंबई व पुणे)/ (समिती क्र. २-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र. ३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प.दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/ कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय : शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा सक्षमपणे वापर करणेबाबत.
संदर्भ: १. परिपत्रक क्र.१०/२०१७ क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/१५४१
दिनांक २० मार्च २०१७
२. परिपत्रक क्र.२३/२०१८ क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/३२८२
दिनांक ०२ जून २०१८
३. परिपत्रक क्र.३६/२०१८ क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/५३१५
दिनांक १४ सप्टेंबर २०१८
४. परिपत्रक क्र.१६/२०१९ क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/१८८२
दिनांक २५मार्च, २०१९.
५. परिपत्रक क्र.१८/२०२० क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/१९७५
दिनांक ०९जुलै, २०२०.

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर शासनाने मराठीतून राज्यकारभार करण्याचे आपले धोरण जाहीर केले आहे. सदर धोरणानुसार दिनांक २६ जानेवारी १९६५ पासून मराठी ही राज्याची राजभाषा म्हणून घोषित करण्यात आली. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ मधील तरतुदीनुसार दिनांक १ मे १९६६ पासून वर्जित प्रयोजने वगळता सर्व कामकाज मराठीतून करणे **बंधनकारक** करण्यात आले आहे. त्यानुसार वर्जित प्रयोजने वगळता सर्व कामकाज मराठीतून करण्यासाठी यापूर्वी वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, रा.प. महामंडळातील कार्यालयीन कामकाज १०० टक्के मराठीतून होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. शासनाच्या धोरणाची पायमल्ली होणे ही बाब अत्यंत आक्षेपार्ह आहे. यास्तव पुनश्च: एकदा एकत्रित सर्वसमावेशक सुचना देण्यात येत आहेत.

२. आपल्या कार्यालयातील तसेच आपल्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वर्जित प्रकरणे खेरीज करुन उर्वरित सर्व कामकाजात त्यातही विशेषत्वाने खालील बाबींमध्ये मराठीचा वापर १०० टक्के केला जाईल याची सर्व विभाग नियंत्रक/घटक प्रमुखांनी व्यक्तिश:खात्री करुन घ्यावी.

..२..

## (अ) कार्यालय

- कार्यालयातील सर्व नामफलक व सुचनाफलक मराठीमध्ये लिहिणे. अधिका-यांचे पदनामासह नामफलक (नावातील आद्याक्षरे उच्चाराप्रमाणे मराठीतून लिहणे, जसे एच.एन.आपटे,विभाग नियंत्रक असे न लिहिता ह.ना.आपटे,विभाग नियंत्रक असे), मेजावरील पाटया तसेच आवश्यक ठिकाणी पर्यवेक्षकीय कर्मचा-यांच्या मेजावरील पाटया पदनामासह मराठीत असणे आवश्यक आहे. कर्मचा-यांच्या गणवेशावरील पाटयावरील नावे व पदनाम मराठीतूनच असणे आवश्यक आहे.

## (ब) कामकाज

- कार्यालयात सादर करण्यात येणा-या टिपण्या मराठीतच असाव्यात.
- अधिका-यांनी कार्यालयीन कामकाजासंदर्भात द्यावयाचे शेरे मराठीत नोंदवावेत.
- टिपणीवर सर्व कर्मचा-यांनी व अधिका-यांनी मराठीतच स्वाक्षरी करुन स्वाक्षरीखाली मराठी अद्याक्षरासह नाव, दिनांक व पदनाम मराठीत नमुद करुन टिपणी, पत्रव्यवहार व अन्य ठिकाणी मराठी आकडे नमुद करावेत. लेखाजोखा, तक्ते, वेतनपत्रिका, वार्षिक ताळेबंद या मधील मजकूर व आकडेही मराठीत असावेत.
- गोपनीय अहवाल/मूल्यांकन अहवाल कोणत्याही परिस्थितीत मराठीत सादर करावेत.
- सर्व परिपत्रके/निर्णय,विविध प्रकारच्या नोंदवहीतील नोंदी मराठीत असणे आवश्यक आहे.
- विभाग/घटकामार्फत करण्यात येणारा दैनंदिन पत्रव्यवहार मराठीतच करण्यात यावा.
- निविदा संदर्भातील कागदपत्रे शक्यतो मराठीत प्रसिध्द करावीत.ते शक्य नसल्यास, इंग्रजीमधील निविदेचा मराठी अनुवाद प्रसिध्द करावा. कार्यालयातून निर्गमित करण्यात येणा-या जाहीराती/निविदा यांना मराठी वृत्तपत्रातून ठळक प्रसिध्दी देण्यात यावी.
- विभाग/घटकामार्फत निर्गमित करण्यात येणारे सर्व प्रकारचे आदेश मराठीत प्रसारित करावेत.

## (क) इतर आवश्यक कामकाज

वर्जित प्रयोजनाबाबत अशा सूचना देण्यात येत आहेत कि :-
(१) सक्षम न्यायालयात शपथपत्र इंग्रजीतून दाखल करावे लागणार असले तरी त्याबाबतचा पत्रव्यवहार, कार्यालयीन टिप्पण्या मराठीतच सादर कराव्यात .
(२) अशाच प्रकारे केंद्र शासनाशी /अन्य राज्यशासनाशी करावयाचा पत्रव्यवहार इंग्रजीतून करावा लागणार असला तरी त्या संबंधींच्या टिप्पण्या मराठीतच असाव्यात.
(३) याच प्रकारे जेथे इंग्रजीचा वापर करणे अनिवार्य असेल तेथेही वरील अनुक्रमाक (१), १(२)प्रमाणे कार्यवाही करावी.

३. वर नमूद केल्यानुसार कार्यालयातील कामकाजामध्ये १०० टक्के मराठीचा वापर होईल याकडे संबंधित विभाग नियंत्रक/घटक प्रमुखांनी **व्यक्तिशः** लक्ष देऊन आवश्यक ती उपाययोजना करावी. त्यासाठी त्यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयांना आवश्यक त्या सूचना तात्काळ द्याव्यात. त्यानुसार १००% अंमलबजावणी होत असल्याची खात्री करुन घेऊन संबंधित विभाग नियंत्रक / घटक प्रमुख यांनी त्याबाबतचे **स्वतःच्या सहीचे प्रमाणपत्र** जोडलेला पूर्तता अहवाल दर ३ महिन्यांनी परिपत्रक क्र.१६/२०१९ अन्वये,दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार सादर करावा.

४. महामंडळाकडून वेगवेगळया योजना राबविल्या जातात. सदर योजनांची माहिती जनसामान्यांना देताना व त्यांसदर्भात चर्चा करताना तसेच दुरध्वनीवरुन / भ्रमणध्वनीवरुन बोलताना सर्व कर्मचारी /अधिकारी यांनी मराठी भाषेचा वापर करणे **बंधनकारक** आहे.

५. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन माहिती व तंत्रज्ञान विभागाने जनसामान्यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचा अधिकार, आपले सरकार, ई-निविदा इत्यादी ऑन लाईन सेवा/पोर्टल मराठी भाषेत उपलब्ध असणे अनिवार्य आहे.

६. रा.प.महामंडळाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द केली जाणारी माहिती मराठी भाषेतून असावी. तसेच राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावर विभागाची माहिती सर्वांच्या निदर्शनास आणणे आवश्यक वाटत असल्यास संकेतस्थळावर ती केवळ इंग्रजी भाषेत न ठेवता मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषेत माहिती प्रसिध्द करावी.

७. वर्जित प्रयोजन वगळता, अन्य सर्व प्रकरणी महामंडळातर्फे जिल्हास्तरीय व इतर दुय्यम न्यायालयात दाखल करण्याचे दावे मराठी भाषेतून दाखल करण्यात यावेत.

८. प्रत्येक विभागाने/घटकाने एक **"मराठी भाषा दक्षता अधिकारी"** नेमावा. हा अधिकारी आपल्या कार्यालयात मराठी भाषेचा वापर होतो किंवा कसे याची तपासणी करील. (सदर मराठी भाषा अधिका-याची नेमणूक विभागांतर्गत कार्यरत अधिका-यांमधून करुन त्यांच्याकडे ही जबाबदारी सोपवावी.) त्यानुसार सर्व विभाग / घटक तसेच मध्यवर्ती कार्यालयातील खाते / शाखा यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील कार्यरत अधिका-यांपैकी एका अधिका-याची सदर कामासाठी नियुक्ती करावी.

९. आपल्या कार्यालयातील तसेच आपल्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वर्जित प्रयोजने खेरीज करुन उर्वरित सर्व कामकाजात त्यातही विशेषत्वाने खालील बाबींमध्ये मराठीचा वापर केला जाईल याची **मराठी भाषा दक्षता अधिकारी** यांनी व्यक्तिश: खात्री करुन घ्यावी.

१०. काही विभाग/घटक प्रमुख हे कार्यालयातील अधिका-यांची /कर्मचा-यांची अद्याक्षरे उच्चाराप्रमाणे टिपण्णीवर व पत्र व्यवहारावर मराठीत लिहीत नसल्याने सदरची अद्याक्षरे इंग्रजी भाषेतील उच्चाराप्रमाणे लिहीत असल्याने, एका शब्दाच्या चुकीस रु.१००/- दंड याप्रमाणे पुढील प्रत्येक शब्दाच्या चुकीस रु.१००/- च्या पटीत दंड करणे अशी शिक्षा करावयाची आहे. सदर दंडाची नोंद सेवा पुस्तिकेत व गोपनिय अहवालात करण्यात यावी.

११. वर्जित प्रयोजने वगळता इतर बाबतीत सयुक्तीक कारणे नसताना राजभाषा मराठीचा वापर करण्यास टाळाटाळ करणा-या अधिकारी व कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्यात यावी. त्या खेरीज त्यांच्याविरुध्द अनुक्रमे लेखी ताकीद देणे,गोपनिय अहवालात नोंद घेणे,ठपका ठेवणे.एका वर्षाकरिता बढती रोखणे किंवा एका वर्षाकरिता पुढील वेतन वाढ रोखणे इत्यादी या शिक्षा देण्यात याव्यात.

त्यानंतरही सदर कर्मचा-यांनी मराठीतून कामकाज करण्यास कुचराई केल्यास त्यांच्या विरुध्द **शिस्तभंगाची कठोरतम** कारवाई करण्यात यावी.

या परिपत्रकातील सुचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्याची जबाबदारी विभाग / घटक प्रमुखांची आहे. सदर परिपत्रक कार्यालयाच्या सुचना फलकावर ठळकपणे प्रदर्शित करावे तसेच आपल्या अधीनस्त सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून त्याबाबत संबंधितांच्या स्वाक्ष-या घेऊन त्याची नोंद आपल्या दप्तरी ठेवण्यात यावी.

सदरचे परिपत्रक हे मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)



D:\GAD\Circular\Gen Circular-2021.docx

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/विधी सल्लागार (वर्ग-१) /महाव्यवस्थापक(भां.व ख.)/महाव्यवस्थापक(वाहतूक)/महाव्यवस्थापक(नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य कामगार अधिकारी/ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन) / सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/(प्रशासन)/(मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/ (मनुष्यबळ नियोजन/ समन्वय)/ (घटकसंवर्ग).

**कर्मचारीवर्ग खाते**
**परिपत्रक क्र. ०७/२०२१**

क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/ ६५६
म.रा.मा.प.महामंडळ,
रा.प.मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आ.ना.मार्ग,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४०० ००८.
दिनांक ३० जानेवारी, २०२१.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /
नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषयः गंभीर आजारामध्ये अवयव प्रतिरोपण व नवीन आजारांचा समावेश करुन सदर आजारावरील औषधोपचारांकरिता अग्रिम मंजूर करणेबाबत.**

**संदर्भ : परिपत्रक क्रमांक २६/२००६, जा.क्र. राप/कर्मवर्ग/६०१-वै/४९०० दिनांक ३१.१०.२००६**

........

शासन निर्णय दि.१९.०३.२००५ अन्वये २७ आकस्मिक व ५ गंभीर (१. हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे २. हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया ३. ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया ४. मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया ५. कर्करोग ) या आजारांचा समावेश असून सदर आजारांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीबाबत केलेल्या सुधारणा या कार्यालयाचे संदर्भित परिपत्रकान्वये रा.प.महामंडळासाठी लागू करण्यात आल्या आहेत.

शासन निर्णय दि.१०.०२.२००६ नुसार ५ गंभीर आजारांकरिता असलेली वैद्यकीय अग्रिमाची कमाल मर्यादा रु.१.०० लाखावरुन रु.१.५० लाख केल्याने सदर सुधारणा या कार्यालयाचे परिपत्रक क्र.१३/२००६ दि.०३.०६.२००६ नुसार रा.प.महामंडळासाठी लागू करण्यात आले आहे.

तथापि, शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक- वैखप्र-२०१९/प्र.क्र.२३६/राकावि-२ दि.२०.०३.२०२० नुसार शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक- एमएजी-२००५/ ९प्र.क्र.१/ आरोग्य-३, दि.१९.०३.२००५ अन्वये विर्निदीष्ट करण्यात आलेल्या गंभीर आजार / उपचारांमध्ये खालील नमूद आजार / उपचार यांचा अंतर्भाव केल्यानुसार सदर आजारांचा संदर्भित परिपत्रकांन्वये रा.प.महामंडळासाठी विनिर्दीष्ट केलेल्या गंभीर आजारांच्या यादीमध्ये खालील नमुद अटी व शर्तीच्या अधीन राहून समावेश करण्यात येत आहे.

| अ.क्र. | वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीकरिता नरव्याने अंतर्भूत करण्यात आलेले गंभीर आजार / उपचार | वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीची प्रत्यक्ष खर्च किंवा जास्तीत जास्त कमाल मर्यादा (पॅकेज अंतर्गत) |
|---|---|---|
| १ | यकृत प्रतिरोपण (Liver Transplant ) (Live Donor वरील शस्त्रक्रिया असल्यास त्यासाठी रु.२.५० लाखच्या मर्यादेत) | रु.१५ लाख फक्त (+ रु.२.५० लाख) |
| २ | हृदय प्रतिरोपण ( Heart Transplant ) | रु.१५ लाख फक्त |
| ३ | फुपफुस प्रतिरोपण (Lung Transplant ) | रु.१५ लाख फक्त |
| ४ | अस्थिमज्जा प्रतिरोपण (Bone MarroTransplant) | रु.८ लाख फक्त |
| ५ | कर्णावर्त प्रतिरोपण (Cochlear Transplant ) | रु.६ लाख फक्त |
| ६ | हृदय व फुफफुस प्रतिरोपण (एकत्र) ( Heart & Lung Transplant (Together) | रु.२० लाख फक्त |

कृ.मा.प.

तसेच सदर शासन निर्णय दि. २७.०३.२०२० मध्ये नमुद केल्यानुसार नवीन समावेश केलेल्या गंभीर आजार / उपचार यांच्या वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीच्या प्रयोजनार्थ खालील तरतूदी व अटींचा समावेश आहे.

२. उपरोक्त नमूद तक्त्यातील आजारांसाठी आंतररुग्ण म्हणून शासकीय तसेच खाजगी रुग्णालयात झालेला प्रत्यक्ष खर्च अथवा आजारासमोर नमूद करण्यात आलेली कमाल मर्यादेत (celling limit ) यापैकी जी रक्कम कमी असेल ती अनुज्ञेय करण्यात यावी. कमाल मर्यादेपेक्षा जास्त झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती कोणत्याही परिस्थितीत करण्यात येऊ नये. वास्तव्यावरील खर्चाची परिगणना करताना शासन निर्णय दिनांक १९ मार्च २००५ मधील तक्त्याप्रमाणे करावी व ना-देय बाबी (उदा.कंझुमेअबल,अल्कोहोलीक,टॉनिक,खाद्यपदार्थ इ.) वगळाव्यात. (शासन निर्णय १९ मार्च २००५ नुसार या कार्यालयाचे परिपत्रकक्र. २६/२००६ दि.३१.१०.२००६ अन्वये सूचना प्रसारीत करण्यात आल्या आहेत.)

३. अवयव प्रतिरोपण शस्त्रक्रिया ही पूर्वनियोजित शस्त्रक्रिया असून त्यासाठी उपचार हे ज्या रुग्णालयांना मानवी अवयव प्रतिरोपण १९९४ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे अशा रुग्णालयांत उपचार घेण्यात यावेत. तसेच प्रत्यक्ष उपचार चालू करण्यापूर्वी ज्या तज्ञ डॉक्टरांकडून उपचार घ्यावयाचे आहेत त्यांच्याकडून उपचारानंतर रुग्ण बरा होण्याची शक्यता (treatment prognosis ) (complications )याबाबत प्रमाणपत्र उपचारापूर्वी प्राप्त करुन घ्यावे.

४. उपरोक्त तक्त्यात नवीन अंतर्भूत केलेल्या गंभीर आजारासाठी / उपचारासाठी जी वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीस मर्यादा निश्चित केली आहे त्या मर्यादेच्या जास्तीत जास्त २५ (पंचवीस ) टक्के एवढे वैद्यकीय अग्रीम प्रकरणनिहाय मंजूर करण्यात यावे.

५. प्राधिकृत वैद्यकीय अधिका-याने वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीचे देयके तपासून आजार प्रमाणीत करताना तो या शासन निर्णयान्वये कोणत्या आजारामध्ये मोडतो हे सदर आजाराच्या नावासह स्पष्ट नमूद करावे.

६. अग्रीम मंजूर करण्याबाबतचे सर्वसाधारण नियम वर नमूद शासन निर्णय दि.२७.०३.२०२० सोबतच्या परिशिष्ट 'अ' प्रमाणेच राहतील.सदर शासन निर्णय व परिशिष्ट 'अ' सोबत जोडण्यात आले आहे.

७. हे आदेश शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू राहतील.

८. सुधारित शासन निर्णयामुळे परिपत्रक ०९/८७ भाग १ व २ या योजनेअतंर्गत येणाऱ्या यापूर्वीच्या सूचनांमध्ये इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही, याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे तसेच सदर परिपत्रकास सूचना फलकावर प्रसिध्दी देण्यात यावी.

सदर सूचना लेखा खात्याच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.वे औ.सं )

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार / सचिव, म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी(सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ८/२०२१

क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/ 9342
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-८.
दिनांक: 09 ~~जानेवारी~~ मार्च, २०२१

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/ नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी / नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषय: आकस्मिक आजारांमध्ये कोविड-१९ या नविन आजाराचा समावेश करणेबाबत.

संदर्भ: १.परिपत्रक क्र.९/८७ जा.क्र.राप/कर्मवर्ग/६०१-वै/२२५८ दिनांक २३.०४.१९८७.
२. परिपत्रक क्र.१९/९३ जा.क्र.राप/कर्मवर्ग/६०१-वै/६११५ दिनांक २५.१०.१९९३.
३. शासन निर्णय क्र.एमएजी-१०९९/प्रक्र ४०/आरोग्य-३ दिनांक २९.०७.१९९९.
४. परिपत्रक क्र.१३/२००६ दिनांक ३.६.२००६.
५. शासन निर्णय क्रमांक एमएजी २००५/९/प्रक्र १ आरोग्य-३ दिनांक १९.०३.२००५.
६. शासन निर्णय क्रमांक वैखप्र-२०२० प्रक्र. ६६/राकावि-२ दिनांक १७.१२.२०२०.

राज्य परिवहन अधिकारी/कर्मचा-यांना निकडीच्या परिस्थितीतील रोगांच्या/आजारांच्या उपचारांसाठी करावा लागणा-या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची योजना परिपत्रक क्र.९/८७ अन्वये ठरवून दिलेली आहे. सदरची योजना राज्य शासनाच्या या संदर्भातील धोरणावर आधारलेली आहे.

महामंडळ ठराव क्र.५१ दि.२०.०३.१९८६ अन्वये महाराष्ट्र शासनाने शासकीय कर्मचा-यांसाठी लागू केलेली रुग्णालयीन खर्चाची योजना, वेळोवेळी दुरुस्त केल्यानुसार रा.प.कर्मचा-यांना लागू करण्यात आली आहे. त्यानुसार रा.प.कर्मचारी व त्यांचे कुटूंबिय यांचेसाठी आकस्मिक आजार व गंभीर आजाराकरिता येणा-या औषधोपचारासाठी येणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येते. यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या बदलानुसार सुधारणा करण्यात येते. शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी वेळोवेळी केलेले बदल रा.प.महामंडळास लागू करण्यात आले आहेत.

२. शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक: वैखप्र-२०२०/ प्र.क्र.६६/राकावि-२ दिनांक १७ डिसेंबर २०२० मधील विहित तरतूदीनुसार कोव्हिड-१९ या नवीन आजाराचा समावेश २७ आकस्मिक आजारांत करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत.

कृ.मा.प.

१) शासन निर्णयान्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या एकूण २७ आकस्मिक आजारांमध्ये आणखी नविन १ (एक) आकस्मिक आजारांमध्ये अनु क्र.२८ येथे कोविड-१९ या नविन आकस्मिक आजाराचा समावेश करण्यात येत आहे.

२) वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीसाठी रुग्ण कोविड-१९ बाधित असल्याचे वैद्यकीय अहवालात नमूद असले पाहिजे तसेच रुग्णाच्या रक्तातील Spo2 (प्राणवायू पातळी) ही ९५ टक्क्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

३) हे आदेश दि.०२ सप्टेंबर, २०२० पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहतील.

३. वरील शासन निर्णयानुसार कोविड-१९ या आजाराची वैद्यकीय देयके अदा करण्याकरिता खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) एकुण २७ आकस्मिक आजारांमध्ये अ.क्र.२८ येथे कोविड-१९ या आणखी एका आकस्मिक आजाराचा समावेश करण्यात येत आहे.

२) कोविड-१९ या आजारावरील वैद्यकीय देयकाची प्रतिपूर्ती करताना शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने विहित केलेल्या दरानुसार व या संदर्भातील शासन निर्णयातील अटी व शर्ती विचारात घेऊन वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात यावी.

३) कोविड-१९ या संबंधीच्या वैद्यकीय देयकांची प्रतिपूर्ती दि.०२ सप्टेंबर,२०२० पासून पूर्वलक्षी प्रभावाने अनुज्ञेय असेल.

४) रा.प.विभागांमध्ये कोविड-१९ या आजाराची वैद्यकीय देयके अद्याप प्रलंबित असल्यास, सदरची वैद्यकीय देयके रा.प.नियमानुसार त्वरीत अदा करण्यात यावीत.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

प्रतः माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / मुख्य विधि अधिकारी / सचिव, म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी(सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.१० /२०२१

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/१६१८
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई- ०८
दिनांक :१८ .०३.२०२१

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे) / (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक ) / (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे / औरंगाबाद / नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय :- कोरोना विषाणु प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शासन आदेशानुसार रा.प.महामंडळातील कर्मचारी यांची उपस्थिती नियंत्रित करण्याबाबत.

संदर्भ :- शासन आदेश महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन व मदत पुनर्वसन विभाग डी.एम.यु./२०२०प्र.क्र.९२आव्य -१ दि.१५.०३.२०२१.

******

कोरोना विषाणूंचा नव्याने होणारा (COVID-१९) प्रसार प्रशासकीय कार्यालयामध्ये होऊन कर्मचा-यांना संसर्ग होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शासनाने कार्यालयीन कर्मचा-यांची उपस्थिती ५० टक्के नियंत्रित करण्याचे आदेश दिलेले आहेत.

२. शासनाने रा.प.महामंडळास वाहतुक व्यवसायासाठी "लोकोपयोगी सेवा" म्हणून घोषित केलेले आहे. त्यामुळे वाहतुक सेवा पुरविणे रा.प.महामंडळास बंधनकारक आहे. रा.प.आगार, विभागीय कार्यशाळा यांचा प्रवाशी वाहतूकीशी थेट संबंध येतो. त्यामुळे तेथे काम करणा-या चालक, वाहक, कार्यशाळा कर्मचारी, तसेच सर्व अधिकारी व पर्यवेक्षक पदावरील कर्मचा-यांना वगळून रा.प. महामंडळातील प्रशासकीय कर्मचारी यांची उपस्थिती ५० टक्के नियंत्रित करण्याबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

अ) रा.प.महामंडळातील तातडीचे व महत्वाचे काम चालू राहण्याच्या दृष्टीने संबंधित खाते / विभाग / घटक प्रमुख यांनी त्यांचे नियंत्रणाखालील चालक,वाहक, कार्यशाळा कर्मचारी, अधिकारी व पर्यवेक्षक पदावरील कर्मचा-यांना वगळुन प्रशासकीय कर्मचा-यांना दररोज कार्यालयात न बोलवता त्यांना आळीपाळीने कार्यालयात बोलवावे व त्यानुसार कामाचे नियोजन करावे.अशा प्रकारे कार्यवाही करताना कार्यालयातील एकूण कर्मचारी यांची उपस्थिती ५० टक्के राहील, याची दक्षता घेण्यात यावी.

आ) नव्याने प्रसार होणा-या कोविड-१९ च्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य शासन/जिल्हा प्रशासन/स्थानिक प्रशासन कोरोना विषाणूच्या प्रसाराच्या तीव्रतेनुसार जिल्हा/स्थानिक पातळीवर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लॉकडाऊन जाहीर करुन कर्मचा-यांच्या उपस्थितीबाबत जे आदेश / सुचना निर्गमित करील ते आदेश त्या संबधित क्षेत्रात कार्यरत असणा-या रा.प.महामंडळातील कर्मचा-यांना आपोआप लागू राहतील. याबाबत संबंधित खाते / विभाग / घटक प्रमुख यांनी स्थानिक पातळीवर नियमाधिन कार्यवाही करुन त्या अनुषंगाने सुचना प्रसारीत कराव्यात.

..२..

इ) कार्यालयात उपस्थित नसलेल्या दिवशी कर्मचारी यांनी घरी राहुन आवश्यकतेनुसार कार्यालयीन कामकाज पार पाडणे आवश्यक राहील.

ई) कामाची तातडी व निकड विचारात घेता कर्मचारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी बोलाविण्यात आल्यास त्यांनी कार्यालयात हजर राहणे बंधनकारक राहील.

उ) कर्मचा-यांच्या ५० टक्के उपस्थितीबाबतची नोंद संबंधीत खाते प्रमुख / घटक प्रमुख / विभाग प्रमुख यांनी त्यांच्या दप्तरी ठेवावी.

ऊ) सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचा संपर्क पत्ता, भ्रमणध्वनी, ई-मेल आयडी कार्यालयास उपलब्ध करुन द्यावा.तसेच संपर्क पत्त्यावर ते उपलब्ध राहतील याची दक्षता घ्यावी.

ए) सदरचे आदेश हे परिपत्रकीय सुचना प्रसारीत झालेल्या दिनांकापासून दि.३१.०३.२०२१ पर्यंत लागू राहतील.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / विधी सल्लागार (वर्ग-१)/ महाव्यवस्थापक(भां.व ख.) / महाव्यवस्थापक(वाहतूक) /महाव्यवस्थापक(नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम) / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) / मुख्य कामगार अधिकारी / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी / मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.) / अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव/कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन) / सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन) /(प्रशासन) / (मुख्यालय) / (राज्यसंवर्ग) / (मागासवर्ग) / (मनुष्यबळ नियोजन / समन्वय) / (घटकसंवर्ग).

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ११ /२०२१

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/ १८२०
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ०८
दिनांक :०८.०४.२०२१

- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/
  कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
  परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय:- कोरोना विषाणु प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शासन आदेशानुसार
रा.प.महामंडळातील कर्मचारी यांची उपस्थिती नियंत्रित करणेबाबत व
रा.प.कार्यालयामधील गर्दी टाळण्यासाठी घ्यावयाच्या दक्षतेबाबत.

संदर्भ :- १.शासन आदेश, महसूल वने, आपत्ती व्यवस्थापन व मदत पुनर्वसन विभाग
डी.एम.यु./२०२०प्र.क्र.९२आव्य-१ दि.०४.०४.२०२१
२. कर्मचारीवर्ग खाते, परिपत्रक क्र.१०/२०२१,
क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/१६१९दि.१९.०३.२०२१.

******

शासनाच्या संदर्भाधिन आदेशामधील तरतूदींच्या अनुपालनार्थ, कोरोना विषाणूंचा नव्याने होणारा (COVID-१९) प्रसार रा.प.महामंडळातील कार्यालयामध्ये होऊ नये, तसेच महामंडळातील कर्मचारी यांना त्याचा संसर्ग होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून रा.प.महामंडळाच्या प्रशासकीय कर्मचा-यांची उपस्थिती ५० टक्के नियंत्रित करणेबाबत व रा.प. कार्यालयांमधील गर्दी टाळण्यासाठी घ्यावयाच्या दक्षतेबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. जिल्हाधिकारी कार्यालये किंवा स्थानिक प्रशासन कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या तीव्रतेनुसार त्यांच्या अधिकार क्षेत्रात कार्यरत असणा-या कर्मचा-यांच्या उपस्थितीबाबत वेळोवेळी जे आदेश पारित करील त्यांच्या अमंलबजावणीबाबत संबंधित खाते / विभाग / घटक प्रमुख यांनी नियमाधिन कार्यवाही करावी.

२. शासनाने रा.प.महामंडळास वाहतूक व्यवसायासाठी लोकपयोगी सेवा म्हणून जाहिर केले आहे. तसेच उक्त शासन आदेशात प्रवाशी वाहतूक पूर्ण आसनक्षमतेनुसार चालू ठेवण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे वाहतूक सेवा पुरविणे रा.प.महामंडळास बंधनकारक आहे. सबब रा.प.आगार, मध्यवर्ती कार्यशाळा, विभागीय कार्यशाळा येथे काम करणा-या चालक, वाहक, कार्यशाळा कर्मचारी व अधिकारी यांच्या कामाच्या नियोजनानुसार व आवश्यकतेनुसार त्यांच्या उपस्थितीबाबत खाते / विभाग / घटक प्रमुख यांनी कार्यवाही करावी.

३. इतर प्रशासकीय कर्मचा-यांना व पर्यवेक्षकीय अधिका-यांना दररोज कार्यालयात न बोलवता त्यांना आळीपाळीने कार्यालयात बोलवावे व त्यानुसार कामाचे नियोजन करावे. अशा प्रकारे कार्यवाही करताना कार्यालयातील एकूण कर्मचारी यांची संख्या ५० टक्के राहील, याची दक्षता घेण्यात यावी.

४. वर्ग-२ अधिका-यांच्या उपस्थितीबाबत खाते प्रमुख / विभाग / घटक प्रमुखांनी आवश्यकतेनुसार निर्णय घ्यावेत.

५. रा.प.महामंडळातील सर्व कार्यालयातील अधिकारी व कर्मचा-यांच्या बैठकांच्या सहभागाबाबत, जर संबधित अधिकारी व कर्मचारी एकाच कार्यालयाच्या आवारात कार्यरत असले, तर सामाजिक अंतर राखून व सर्व नियम पाळून प्रत्यक्ष बैठकास हजर रहावे. अन्य बैठका दुरचित्रसंवादाद्वारे (गुगल मीट/झुम इ.द्वारे) आयोजित कराव्यात.

६. आवश्यक व महत्वाच्या कामासाठी अभ्यागतांना खाते / विभाग / घटक प्रमुखांची भेट घ्यावयाची असल्यास त्यांनी आरटीपीसीआर (RTPCR) तपासणी करुन ते कोरोना बाधित नसल्याचे ४८ तासांपुर्वीचे प्रमाणपत्र सादर केल्यास अपवादात्मक परिस्थितीत संबधित खाते / विभाग प्रमुख भेटीसाठी परवानगी देऊ शकतील.

७. रा.प.कर्मचारी व अधिकारी यांनी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार लवकरात लवकर कोविड-१९ विषाणू वरील प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत लसीकरण करुन घेणे आवश्यक राहील.

८. सदरचे आदेश परिपत्रकीय सुचना निर्गमित केलेल्या दिनांकापासून ते दि.३०.०४.२०२१ पर्यंत लागू राहतील.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां. व ख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य कामगार अधिकारी/ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/ विधी सल्लागार (वर्ग-१)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/ (प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/(मागासवर्ग) / (मनुष्यबळ /नियोजन / समन्वय)/ (घटकसंवर्ग).

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.- ९२/२०२१

क्रमांक:राप/कर्मवर्ग/आस्था/४०८-ई(१)/ ९८८०
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई- ०८
दिनांक : २०.०४.२०२१

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/
  कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
  परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

**विषय:-** सर्व रा.प.कार्यालयामध्ये काम करणा-या नियमित तसेच कंत्राटी स्वरुपातील अधिकारी / कर्मचारी /सल्लागार यांचेसाठी कार्यालयात परिधान करावयाच्या पोशाखा संदर्भात (ड्रेस कोड) मागदर्शक सुचना.

**संदर्भ:-** १.शासन शुध्दीपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्र.संकीर्ण-२०२०/ प्र.क्र.७१/१८ (र.व का.) दि.१६मार्च,२०२१
२.कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.३६/२०२०,
क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/४०८- ई(१)/४२७७दि.१६.१२.२०२०.

******

संदर्भाधिन शासन शुध्दीपत्रकाची प्रत माहीतीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

रा.प.महामंडळातील सर्व कार्यालयामध्ये काम करणा-या अधिकारी व कर्मचारी (ज्या सर्व संवर्गातील कर्मचा-यांना विविध रा.प.परिपत्रकान्वये,गणवेश नेमून देण्यात आले आहेत,असे रा.प.कर्मचारी वगळता ) यांचा कार्यालयातील दैंनदिन पेहराव कशा प्रकारचा असावा याबाबत संदर्भ क्र.२ येथील परिपत्रकान्वये,सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

तथापि,शासन शुध्दीपत्रकानुसार "तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जीन्स व टी-शर्ट चा वापर कार्यालयामध्ये करु नये " या वाक्याऐवजी " "तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी टी-शर्ट चा वापर कार्यालयामध्ये करु नये" असा बदल करण्यात आलेला आहे.

त्याअनुषंगाने शासन शुध्दीपत्रकातील बदल घटक/विभाग प्रमुखांनी आपल्या कार्यालयाच्या,सुचना फलकावर ठळकपणे प्रदर्शित करुन आपल्या अधिनस्त असणा-या सर्व नियमित तसेच कंत्राटी स्वरूपातील अधिकारी / कर्मचारी/सल्लागार यांच्या निदर्शनास आणावे.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

सोबत - वरीलप्रमाणे.

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/विधी सल्लागार (वर्ग-१) /महाव्यवस्थापक(भां.व ख.)/महाव्यवस्थापक(वाहतूक)/महाव्यवस्थापक(नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) / मुख्य कामगार अधिकारी/ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/(प्रशासन)/ (मुख्यालय) /(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग) / (मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/ (घटकसंवर्ग).

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. १३ /२०२१

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/ २००८
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ०८
दिनांक : २३.०४.२०२१

- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/
  कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
  परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय:- कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शासन आदेशानुसार रा.प.महामंडळातील कर्मचारी यांची उपस्थिती दि.०१.०५.२०२१ पर्यंत १५ टक्के नियंत्रित करणेबाबत.

संदर्भ :- १.कर्मचारीवर्ग खाते, परिपत्रक क्र.१०/२०२१,
क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/१६१९, दि.१९.०३.२०२१.
२. कर्मचारीवर्ग खाते, परिपत्रक क्र.११/२०२१,
क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/१९२०, दि.०९.०४.२०२१.
३. शासन आदेश, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन व मदत पुनर्वसन विभाग
डी.एम.यु./२०२०/प्र.क्र.९२/आव्य-१, दि.२१ एप्रिल २०२१

******

शासनाच्या संदर्भाधिन आदेशामधील तरतूदींच्या अनुपालनार्थ, कोरोना विषाणूंचा नव्याने होणारा (COVID-१९) प्रसार रा.प.महामंडळातील कार्यालयामध्ये होऊ नये, तसेच महामंडळातील कर्मचारी यांना त्याचा संसर्ग होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कोविड-१९ या विषाणूंची साखळी तोडण्यासाठी रा.प.महामंडळाच्या प्रशासकीय कर्मचा-यांची उपस्थिती दि.०१.०५.२०२१ पर्यंत १५ टक्के नियंत्रित करणेबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

२. शासनाने रा.प.महामंडळास वाहतूक व्यवसायासाठी लोकपयोगी सेवा म्हणून जाहिर केले आहे. तसेच उक्त शासन आदेशात प्रवाशी वाहतूक ५० टक्के आसनक्षमतेनुसार चालू ठेवण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे वाहतूक सेवा पुरविणे रा.प.महामंडळास बंधनकारक आहे. सबब रा.प.आगार, मध्यवर्ती कार्यशाळा, विभागीय कार्यशाळा येथे काम करणा-या चालक, वाहक, कार्यशाळा कर्मचारी व अधिकारी यांच्या कामाच्या नियोजनानुसार व आवश्यकतेनुसार त्यांच्या उपस्थितीबाबत खाते/विभाग / घटक प्रमुख यांनी कार्यवाही करावी.

३. मध्यवर्ती कार्यालय, विभागीय कार्यालय व मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी इ. ठिकाणी काम करणा-या प्रशासकीय कर्मचा-यांना दररोज कार्यालयात न बोलवता उपलब्ध कर्मचा-यांचे कामाचे नियोजन करुन कार्यालयातील एकूण कर्मचारी यांची संख्या कमीत कमी १५ टक्के असावी व इतर कुठल्याही कारणास्तव प्रशासकीय कर्मचा-यांची उपस्थिती ५० टक्केच्या वर जाणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

४. सदरचे आदेश परिपत्रकीय सुचना निर्गमित केलेल्या दिनांकापासून ते दि.०१.०५.२०२१ पर्यंत लागू राहतील.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (का.व औ.सं.)

..२..

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां. व ख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य कामगार अधिकारी/जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/ विधी सल्लागार (वर्ग-१)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन)/ (प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/(मागासवर्ग)/ (मनुष्यबळ /नियोजन / समन्वय)/ (घटकसंवर्ग).

**कर्मचारीवर्ग खाते**

परिपत्रक क्र.१४ /२०२१

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/ 2046

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र वाहतूक भवन,

डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई- ०८

दिनांक30 .०४.२०२१

- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/
  कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
  परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

**विषयः-** कोरोनाविषाणु प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शासन आदेशानुसार रा.प.महामंडळातील कर्मचारी यांची उपस्थिती दि.०१.०५.२०२१ पर्यंत १५ टक्के नियंत्रित करणेबाबत.

**संदर्भ :-** १.कर्मचारीवर्ग खाते,परिपत्रक क्र.१०/२०२१,
क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/१६१९दि.१९.०३.२०२१.

२. कर्मचारीवर्ग खाते,परिपत्रक क्र.११/२०२१,
क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/१९२०दि.०९.०४.२०२१.

३. कर्मचारीवर्ग खाते,परिपत्रक क्र.१३/२०२१,
क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/२००७दि.२३.०४.२०२१.

४.शासन आदेश,महसूल वने,आपत्ती व्यवस्थापन व मदत पुनर्वसन विभाग
डी.एम.यु./२०२०प्र.क्र.९२आव्य-१ दि.२९.०४.२०२१

******

शासनाच्या संदर्भाधिन आदेशान्वये करोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लावण्यात आलेल्या निर्बंधांचा कालावधी दि.०१.०५.२०२१ते १५.०५.२०२१ पर्यंत वाढविण्यात आलेला आहे. सदर आदेशातील तरतूदींच्या अनुपालनार्थ,कोरोना विषाणूचा संसर्ग रा.प.महामंडळातील कर्मचा-यांना होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१३/२०२१ दि.२३.०४.२०२१ मधील सुचना दि.१५.०५.२०२१ पर्यंत कायम राहतील.

याव्यतिरीक्त संदर्भाधिन परिपत्रकातील सुचनांमध्ये अन्य कुठलाही बदल करण्यात आलेला नाही.

(माधव काळे)

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :**

मुख्य सुरक्षाव दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागारव  मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां. वख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य कामगार अधिकारी/जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य अंतर्गतलेखा परीक्षक/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/ विधीसल्लागार (वर्ग-१)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन)/ (प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/(मागासवर्ग)/ (मनुष्यबळ /नियोजन / समन्वय)/ (घटकसंवर्ग).

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. १५ /२०२१

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/ २१५४
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ०८
दिनांक : ०७.०५.२०२१

- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/
  कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
  परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

**विषय :-** रा.प.कर्मचा-यांच्या रजेची गणना करताना लॉकडाऊनच्या कालावधीमुळे निर्माण होणा-या अडचणीबाबत.

**संदर्भ :-**१. क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/४०८ई(१)/१५६१दि.२०.०३.२०२०
२. कर्मचारीवर्ग खाते, परिपत्रक क्र.१७/२०२०
क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/४०८ई(१)/१७८०दि.१९.०६.२०२०
३. कर्मचारीवर्ग खाते, परिपत्रक क्र.३२/२०२०
क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/४०८ई(१)/३२५१दि.३१.१०.२०२०

******

कोरोना विषाणुच्या प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणुन राज्य शासनाने दि.२३.०३.२०२० ते दि.१४.०४.२०२०, दि.१५.०४.२०२०ते दि.०३.०५.२०२०, दि.०४.०५.२०२०ते दि.१७.०५.२०२० व दि.१८.०५.२०२० ते दि.३१.०५.२०२० या चार टप्प्यात लॉकडाऊन जाहीर केले होते. तथापि, जिल्हाधिका-यांनी / स्थानिक प्रशासनाने कोरोना प्रादुर्भावानुसार लॉकडाऊन कालावधीमध्ये रा.प.महामंडळाची प्रवाशी वाहतूक बंद करण्याचे आदेश जारी केले होते. काही जिल्हा / तालुक्यामध्ये शासनाने जिल्हयातील / तालुक्यातील अत्यावश्यक व शासकीय कर्मचा-यांसाठी, परराज्यातील प्रवाशी मजूरांची वाहतूक करण्यासाठी, परदेशातून आलेल्या भारतीय प्रवाशांसाठी वाहतूक व्यवस्था चालू ठेवण्याचे आदेश दिले होते. तसेच महामंडळाचे काही विभाग व घटकांत कोरोना बाधित रा.प.कर्मचा-यांची संख्या वाढल्याने अशी आस्थापने प्रतिबंधीत क्षेत्रे घोषित करुन काही कालावधीसाठी त्या क्षेत्रातील रा.प.आस्थापना बंद करण्याचे आदेश पारित केले होते.

त्या अनुषंगाने, दिनांक २३.०३.२०२० ते दि.१८.०६.२०२० या ८८ दिवसाच्या व दि.१९.०६.२०२० ते दि.३१.१०.२०२० या १३५ दिवसांच्या मिळून एकुण २२३ दिवसांच्या लॉकडाऊन व अनलॉक दरम्यानच्या कालावधीतील कर्मचा-यांचा उपस्थितीबाबत कर्मचा-यांच्या रजेची गणना करताना लॉकडाऊन कालावधीतील रजेची गणना कशा प्रकारे करावी, सेवानिवृत्त कर्मचा-यांचे रजा रोखीकरण, कर्मचा-यांची वार्षिक वेतनवाढ व सेवानिवृत्त कर्मचा-यांचे उपदानाची गणना करताना लॉकडाऊन कालावधीचा अंतर्भाव कसा करावा ? इ. मुद्दयांबाबत विविध विभाग / घटकांकडून मार्गदर्शन करण्याची विनंती करण्यात आली होती. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत :-

१. ज्या आस्थापनांमध्ये जास्त संख्येने रा.प.कर्मचारी तपासणी अंती कोरोना बाधित असल्याचे निर्दशनास आले व स्थानिक प्रशासनाने त्या आस्थापनांना प्रतिबंधीत क्षेत्रे घोषित करुन जेवढया कालावधीसाठी संबंधित रा.प.आस्थापना बंद ठेवण्याचे आदेश पारित केले होते, तेवढया कालावधीसाठी संबंधित रा.प.आस्थापनांमधील कर्मचा-यांना (पूर्वमंजुर अर्जित व तत्सम वैद्यकीय कारणास्तव रजेवर असलेल्या कर्मचा-यां व्यातिरीक्त) लॉकडाऊन कालावधीची उपस्थिती देण्यात यावी.

तसेच जे रा.प.कर्मचारी प्रतिबंधित क्षेत्रात होते व त्यामुळे त्यांना कामगिरीवर हजर राहता आले नाही, अशा कर्मचा-यांना प्रतिबंधित क्षेत्र कालावधीतील दिवसांबाबत सक्षम प्राधिका-याने खातरजमा करुन लॉकडाऊन उपस्थिती देण्यात यावी.

..२..

२. ज्या विभाग/ घटकांमध्ये सिमीत संख्येने रा.प.नियते चालू होती व त्यानुसार मर्यादित कर्मचा-यांना कामगिरीसाठी बोलाविण्यात आले होते परंतु, प्रवाशी प्रतिसादा अभावी कर्तव्य पूर्ण करता आले नाही, किंवा त्यांना उपस्थित असुनही कामगिरी देता आली नाही, अशा नियमित समय वेतनश्रेणीवरील कर्मचा-यांना (पूर्वमंजुर अर्जित व तत्सम वैद्यकीय कारणास्तव रजेवर असलेल्या कर्मचा-यां व्यतिरिक्त) लॉकडाउन कालाधीची उपस्थिती देण्यात यावी.

३. शासनाने जिल्हानिहाय रेड, ऑरेंज आणि ग्रीन क्षेत्र अशी कोरोना बाधितांच्या संख्येनुसार जिल्हयाची विभागणी केल्याने संबंधीत जिल्हाधिका-यांनी / स्थानिक जिल्हा प्रशासनाने ज्या जिल्हा / तालुका / विभाग / प्रभाग इ.मध्ये लॉकडाऊन जाहिर केला होता व रा.प.महामंडळाची वाहतूक बंद ठेवण्याचे आदेश पारित केले होते, अशा जिल्हा / तालुका / विभाग / प्रभाग इ.मधील रा.प.महामंडळाच्या संबंधित सक्षम प्राधिका-यांने अधिनस्त कर्मचा-यांच्या लॉकडाऊन उपस्थिती बाबत वरील बाबी विचारात घेऊन निर्णय घेण्यात यावा.

४. शासनाने काही प्रतिबंधित क्षेत्रात ५० टक्के, २५ टक्के, १५टक्के, १० टक्के, ५टक्के अशी उपस्थिती जाहिर केली होती त्या ठिकाणी शासन निर्णयानुसार कर्मचा-यांची उपस्थिती नियंत्रित करण्यात आली होती. अशा ठिकाणी कामगिरी लावण्यात आलेली असतानाही कर्मचारी गैरहजर राहिले (पूर्वमंजुर अर्जित व तत्सम वैद्यकीय कारणास्तव रजेवर असलेल्या कर्मचा-यांव्यातिरीक्त) अशा कर्मचा-यांची रजा मंजुर/ नामंजुर करण्याबाबत सक्षम प्राधिका-यांनी वरील बाबी विचारात घेऊन निर्णय घ्यावा.

५. लॉकडाऊन व अनलॉकच्या कालावधीत जे कर्मचारी/अधिकारी यांनी विनापरवानगी मुख्यालय सोडले होते अशा अधिकारी/कर्मचा-यांना लॉकडाउन व अनलॉकच्या कालावधीतील उपस्थिती देण्यात येऊ नये.

६. जे रा.प.कर्मचारी कोरोना बाधित होते व त्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र त्यांनी सादर केले असेल, अशा कर्मचा-यांची त्यांच्या खात्यातील देय व अनुज्ञेय अर्जित / वैद्यकीय देय रजा मंजूर करावी.

सदरच्या सुचना लेखा खात्याच्या सहमतीने व मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां. व ख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य कामगार अधिकारी/जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/ विधी सल्लागार (वर्ग-१)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन)/ (प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/(मागासवर्ग)/ (मनुष्यबळ /नियोजन / समन्वय)/ (घटकसंवर्ग).

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.२४ /२०२१

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/ २५६५
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ०८
दिनांक :१६ .०६.२०२१

- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय:- कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शासन आदेशानुसार रा.प.महामंडळातील कर्मचा-यांच्या उपस्थितीबाबत.

****

संदर्भ :- १. कर्मचारीवर्ग खाते, परिपत्रक क्र.१०/२०२१,
क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/१६१९दि.१९.०३.२०२१.
२. कर्मचारीवर्ग खाते, परिपत्रक क्र.२०/२०२१,
क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/२३६३ दि.०१.०६.२०२१.
३. शासन आदेश, महसूल वने, आपत्ती व्यवस्थापन व मदत पुनर्वसन विभाग
डी.एम.यु./२०२०प्र.क्र.९२आव्य-१ दि.०४.०६.२०२१

******

शासनाने राज्यात कोरोना विषाणूंची साखळी तोडण्यासाठी कोविड-१९ च्या साथीच्या रोगाच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक निर्बंध शिथिल करताना, शासकीय कार्यालयातील कर्मचा-यांच्या उपस्थितीबाबत एकूण कोरोना बाधितांचा पॉझिटिव्हीटी दर व ऑक्सिजनच्या निकषानुसार,५ श्रेणी / स्तर घोषित करण्यात आलेले आहेत व त्या त्या स्तरानुसार कार्यालयीन कर्मचा-यांच्या उपस्थितीची टक्केवारी निश्चित करणेबाबत आदेश जारी केलेले आहेत. शासन निर्णयाच्या अनुषंगाने, रा.प. कर्मचा-यांच्या उपस्थितीबाबत खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

२. रा.प.महामंडळातील कर्मचा-यांची उपस्थिती आवश्यकतेनुसार, १०० टक्के इतकी निश्चित करण्यात यावी.

३. स्थानिक प्रशासन (महानगर पालिका आयुक्त / स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण प्रमुख) व जिल्हा प्रशासनामार्फत संबधित क्षेत्राचा ज्या श्रेणीत / स्तरात (level) समावेश करेल. त्या अनुषंगाने रा.प. कर्मचा-यांच्या उपस्थितीबाबत ज्या सुचना निर्गमित करतील त्या सुचना त्यांच्या अधिनस्थ असणा-या रा.प.आस्थापनांना आपोआपलागू राहतील.

४. याबाबत खाते / विभाग / घटक प्रमुख यांनी जरुर ती नियमाधिन कार्यवाही करुन त्याअनुषंगाने सुचना प्रसारित कराव्यात.

वरील सूचना उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :**

मुख्य सुरक्षाव दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागारव मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां. वख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य कामगार अधिकारी/जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य अंतर्गतलेखा परीक्षक/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/ विधीसल्लागार (वर्ग-१)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन)/ (प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/(मागासवर्ग)/ (मनुष्यबळ /नियोजन / समन्वय)/ (घटकसंवर्ग).

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.१७/२०२१

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/२२०५
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ०८
दिनांक : १५.०५.२०२१

- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र. १-मुंबई व पुणे)/ (समिती क्र. २-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र. ३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/
  कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
  परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय:- कोरोनाविषाणु प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शासन आदेशानुसार रा.प.महामंडळातील कर्मचारी यांची उपस्थिती दि.०१.०६.२०२१ पर्यंत १५ टक्के नियंत्रित करणेबाबत.

संदर्भ :- १.कर्मचारीवर्ग खाते, परिपत्रक क्र.१०/२०२१,
क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/१६१९दि.१९.०३.२०२१.
२.कर्मचारीवर्ग खाते, परिपत्रक क्र.११/२०२१,
क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/१९२०दि.०९.०४.२०२१.
३.कर्मचारीवर्ग खाते, परिपत्रक क्र.१३/२०२१,
क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/२००७दि.२३.०४.२०२१.
४.कर्मचारीवर्ग खाते, परिपत्रक क्र.१४/२०२१,
क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/२०७६दि.३०.०४.२०२१.
५.शासन आदेश, महसूल वने, आपत्ती व्यवस्थापन व मदत पुनर्वसन विभाग
डी.एम.यु./२०२०प्र.क्र.९२आव्य-१ दि.१२.०५.२०२१

******

शासनाच्या संदर्भाधिन आदेशामधील तरतूदींच्या अनुपालनार्थ, कोरोना विषाणूंचा नव्याने होणारा (COVID-१९) प्रसार रा.प.महामंडळातील कार्यालयामध्ये होऊ नये, तसेच महामंडळातील कर्मचारी यांना त्याचा संसर्ग होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून रा.प.महामंडळाच्या प्रशासकीय कर्मचा-यांची उपस्थितीबाबत संदर्भाधिन परिपत्रकातील सुचना कायम ठेऊन त्याचा कालावधी दि.०१.०६.२०२१पर्यंत वाढविण्यात येत आहे.

यावतिरीक्त संदर्भाधिन परिपत्रकातील सुचनांमध्ये अन्य कुठलाही बदल करण्यात आलेला नाही.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

..२..

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादररवाना :**

मुख्य सुरक्षाव दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागारव मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां. वख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य कामगार अधिकारी/जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य अंतर्गतलेखा परीक्षक/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/ विधीसल्लागार (वर्ग-१)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन)/ (प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/(मागासवर्ग)/ (मनुष्यबळ /नियोजन / समन्वय)/ (घटकसंवर्ग).
कर्मचारीवर्ग खाते

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.१८/२०२१

क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/ २२१०
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-८.
दिनांक: १७ मे.२०२१

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय,पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /
नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय: आकस्मिक आजारांमध्ये कोविड-१९ या नविन आजाराचा समावेश करणेबाबत.**

**संदर्भ:**
१.परिपत्रक क्र.९/८७ जा.क्र.राप/कर्मवर्ग/६०१-वै/२२५८ दिनांक २३.०४.१९८७.
२. परिपत्रक क्र.१९/९३ जा.क्र.राप/कर्मवर्ग/६०१-वै/६११५ दिनांक २५.१०.१९९३.
३. शासन निर्णय क्र.एमएजी-१०९९/प्रक्र ४०/आरोग्य-३ दिनांक २९.०७.१९९९.
४. परिपत्रक क्र.१३/२००६ दिनांक ३.६.२००६.
५. शासन निर्णय क्रमांक एमएजी २००५/९/प्रक्र १ आरोग्य-३ दिनांक १९.०३.२००५.
६. शासन निर्णय क्रमांक वैखप्र-२०२० प्रक्र. ६६/राकावि-२ दिनांक १७.१२.२०२०.
७. शासन शुध्दीपत्र क्रमांक वैखप्र-२०२०/ प्रक्र. ६६/राकावि-२ दिनांक ३०.०४.२०२१
८. कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. ८/२०२१ दिनांक ०९.०३.२०२१

--------

संदर्भाधीन परिपत्रक क्र.८ अन्वये आकस्मिक आजारांमध्ये कोविड-१९ या नविन आजाराचा समावेश करण्यात आलेला आहे. संदर्भाधीन शासन शुध्दीपत्रकानुसार परिपत्रकामध्ये खालीलप्रमाणे अंशत: बदल करण्यात येत आहे.

"हे आदेश दि. २ सप्टेंबर, २०२० पासून पुर्वलक्षी प्रभावाने लागू राहतील " च्या ऐवजी "हे आदेश दि. २१ मे, २०२० पासून पुर्वलक्षी प्रभावाने लागू राहतील " असा वाचावा.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं )

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.१९/२०२१

क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/ २३२८
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-८.
दिनांक: २९ मे,२०२१

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय,पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र. १-मुंबई व पुणे)/(समिती क्र. २-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र. ३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /
नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय : म्युकरमायकोसीस (Mucormycosis) आजारावर महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतंर्गत उपचार करणेबाबत.**

**संदर्भ : शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक : मफुयो-२०२१/प्र.क्र.१०३/आरोग्य-६ दिनांक : १८.०५.२०२१.**

--------

संदर्भाधीन शासन निर्णयानुसार म्युकरमायकोसीस (Mucormycosis) आजारावर महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतंर्गत उपचार करण्यात येणार आहेत. सदर शासन निर्णय रा.प.महामंडळातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देण्यात यावे.

सदर शासन निर्णयाची प्रत पुढील योग्यत्या कार्यवाहीस्तव सोबत जोडण्यात येत आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं )

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / मुख्य विधि अधिकारी / सचिव, म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी(सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

E:\Medical\Circular 2020.docx

Scanned by CamScanner

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत म्युकरमायकोसीस (Mucormycosis)आजारावर उपचार करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः मफुयो - २०२१/प्र.क्र. १०३ /आरोग्य-६
जी.टी. रुग्णालय आवार, १० वा मजला,
नवीन मंत्रालय, मुंबई -०१
दिनांक: १८ मे, २०२१

वाचा :-

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः रारवयो-२०१८/प्र.क्र.७४/आरोग्य-६, दि. २६ फेब्रुवारी, २०१९.
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः रास्वयो-२०२०/प्र.क्र.८०/आरोग्य-६, दि. २३ मे, २०२०.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः रास्वयो-२०२०/प्र.क्र.८० (भाग-१ )/आरोग्य-६, दि. ११ मे, २०२१.
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी, मुंबई यांचे No: SHAS/OSD/CEO/८१९/२०२१, दिनांक ११.०५.२०२१ चे पत्र.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी, मुंबई यांचे क्र.राआहसो/मुकाअ/विकाअ/८६३/२०२१, दिनांक १८.०५.२०२१ चे पत्र.

**प्रस्तावना :-**

संदर्भीय दिनांक २६.०२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेशी प्रधानमंत्री जन आरोग्य योजना संलग्नीकरण करून एकत्रित स्वरूपात मे. युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीच्या सहकार्याने दिनांक ०१.०४.२०२० पासून राज्यात अंमलात आली आहे. सदरील शासन निर्णयातील परिच्छेद २ मध्ये सदर योजनेंतर्गत लाभार्थी व लाभार्थींचा विमा निश्चित केला असून महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत रू. १.५० लक्ष व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत रू. ५.०० लक्ष निश्चित केला आहे.

कोविड -१९ रुग्णांना अंगीकृत खाजगी रुग्णालयामध्ये उपचार घेण्यासाठी आर्थिक बोजा पडू नये तसेच कोविड -१९ महामारीच्या संकटामध्ये सर्वच नागरिकांना आरोग्य विषयक हमी व आर्थिक दिलासा मिळावा यासाठी मर्यादित कालावधीसाठी योजनेची व्याप्ती सर्व नागरिकांसाठी वाढविणे तसेच महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतील उपचारांचा लाभ लाभार्थी रुग्णांबरोबर इतर रुग्णानांदेखील मिळावा आणि शासकीय रुग्णालयाकरीता राखीव असलेल्या उपचार पद्धती उपलब्ध व्हाव्यात व योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयातील डॉक्टर, इतर कर्मचारी व अनुषंगीक कर्मचारी यांना कोविड -१९ साथरोग प्रतिबंध संदर्भात आवश्यक साधन सामग्री उपलब्ध व्हावी या दृष्टीकोनातून दिनांक २३ मे, २०२० अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. सदर योजनेस संदर्भीय दिनांक ११.०५.२०२१ च्या शासन निर्णयान्वये माहे दिनांक १.०४.२०२१ ते माहे दिनांक ३०.०६.२०२१ या कालावधीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

Scanned by CamScanner

